## पीएम मोदींचा पुणे दौरा; विकासकामांचा करणार शुभारंभ



**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोन दिवसीय पुणे दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते काही विकास कामांची उद्घाटने करणार आहेत आणि काही कार्यक्रमांनाही उपस्थिती लावणार आहेत. पंतप्रधान मोदी यांच्या दौऱ्यामध्ये २६ सप्टेंबरला शिवाजीनगर ते स्वारगेट मेट्रोचे उद्घाटन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते आहे. तसेच स्वारगेट ते कात्रज या भूमिगत मेट्रोच्या कामाचे भूमिपूजनदेखील त्यांच्या हस्ते होणार असल्याचे बोलले जात आहे. त्यानंतर ते शिक्षक प्रसारक मंडळी संस्थेचे स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर सहभागी होतील. त्यानंतर ते पुणे मुक्कामी राहणार आहेत. दुसऱ्या दिवशी २७ सप्टेंबरला ते विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील विकसित भारत या कार्यक्रमाला उपस्थिती लावतील. दुपारी बारा ते अडीच दरम्यानचा काळ हा आरक्षित ठेवण्यात आला आहे.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ६२
www.ramprahar.com

गुरुवार, १९ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


अंतरंग


पनवेलची मतदारसंख्या सहा लाख पार/२

महामार्गावर लूटमार करणारी टोळी गजाआड/६

एसटी-कार अपघातामध्ये दोन जण जखमी/७


### पनवेल महापालिकेच्या चारही प्रभागात स्वच्छता मोहीम

# स्वच्छतेच्या विचारांना कृतीची जोड देऊया

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वच्छतेच्या विचारांना कृतीची जोड देऊया, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि.१८) स्वच्छता ही सेवा मोहिमेवेळी केले. या वेळी पनवेल कोळीवाड्यातील विसर्जन घाटावरील सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला तसेच स्वच्छतेची शपथही घेण्यात आली.

स्वच्छ भारत अभियानाच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय आणि केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालयाच्या वतीने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा मोहीम राबविण्यात येत आहे. स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता या संकल्पनेसह स्वच्छता ही सेवा मोहीम बुधवारपासून महापालिका कायक्षेत्रात चारही प्रभागात उत्साहात सुरूवात झाली. त्यानुसार पनवेलमधील कोळीवाडा येथे आमदार प्रशांत ठाकूर आणि आयुक्त मंगेश चितळे यांच्या उपस्थितीमध्ये या मोहिमेचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, नगररचना विभागाच्या सहाय्यक संचालक ज्योती कवाडे, उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, हारू भगत, यांच्यासह निसर्ग मित्र सामाजिक संस्था, प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरी विश्व विद्यालयाचे सदस्य, साईनाथ मित्र मंडळ, कोळिवाडा गोविंदा पथक, कोळीवाडा पंच,पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पिल्लई आर्ट, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय, केएलई महाविद्यालय, सीकेटी महाविद्यालय आणि गुजराती शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छतेच्या प्रयत्नांमध्ये सामुहिक कृती आणि नागरिकांची शहर स्वच्छतेतील सहभागाची भावना प्रज्वलित करण्यासाठी स्वच्छता ही सेवा मोहीम आयोजित करण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान दुर्लक्षित कचरा साठणाऱ्या ठिकाणी स्वच्छता लक्ष्य युनिट्सद्वारे स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. या स्वच्छता मोहीमेदरम्यान उपक्रमांद्वारे नागरिकांना सहभागी करून घेण्यात येत आहे.

स्वभाव स्वच्छता-संस्कार स्वच्छता हे विचार कृतीमध्ये उतरविण्यासाठी आपण मनापासून निश्चय करूया असे सांगतानाच स्वच्छतेचा आग्रह सगळ्यांनी धरला पाहिजे असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी सांगितले.

प्रभाग समिती क, प्रभाग कामोठे येथे उपायुक्त बाबासाहेब राजळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही मोहिम राबविण्यात आली. तसेच या वेळी श्रीसदस्य, लायन्स क्लब, कफ फाऊंडेशन, महिला मंडळ कामोठे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी, एमएनआर शाळेचे विद्यार्थी, डी.पी पाटील शाळा, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश शाळा, एमएडीपी शाळा, एमजीएम महाविद्यालय, काळसेकर महाविद्यालय, डीपीएस शाळा यांच्या सहभागाने कामोठ्यातील सेक्टर १५ श्री शंकर मंदिर तलाव येथील आतील व बाहेरील परिसर स्वच्छ करून घेण्यात आला तसेच याठिकाणी प्रभाग समिती क प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे, बचत गट, स्वच्छतादुत व नागरिक, स्वच्छता निरीक्षक अतुल वास्कर योगेश कस्तुरे आकाश गायकवाड मिथुन पवार असे एकूण ७०० जणांनी या मोहिमेत सहभागी झाले होते. (पान २ वर..)

# 'वन नेशन वन इलेक्शन'ला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

### मोदी सरकारचा मोठा निर्णय



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने भारतात एक देश एक निवडणूक या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. बुधवारी (दि.१८) झालेल्या बैठकीत मोदी मंत्रिमंडळाने देशात एकाचवेळी निवडणुका घेण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळाला १०० दिवस पूर्ण झाल्यानंतर मंत्रिमंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. वन नेशन वन इलेक्शन कमिटीने हा प्रस्ताव मंत्रिमंडळाकडे पाठवला होता.

देशात विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याची कल्पना आता सोपी झाली आहे. एक देश, एक निवडणूक या प्रस्तावाला मोदी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालानंतर मंत्रिमंडळात या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. एनडीए सरकार हे विधेयक हिवाळी अधिवेशनात संसदेत आणणार आहे. त्यानंतर येत्या काळात याबाबत अधिकृत घोषणा केली जाणार आहे.

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वाखालील समितीने ६२ राजकीय पक्षांशी संपर्क साधला होता. त्यापैकी ३२ पक्षांनी एक देश, एक निवडणुकीला पाठिंबा दिला होता. तर १५ पक्ष विरोधात होते. १५ पक्ष असे होते ज्यांनी प्रतिसाद दिला नाही. केंद्रातील एनडीए सरकारमधील भाजपशिवाय नितीश कुमार यांचा जेडीयू आणि चिराग पासवान यांचा एलजेपी (आर) यांनी एक देश, एक निवडणूक यावर सहमती दर्शवली आहे, तर चंद्राबाबू नायडू यांचा टीडीपीने यावर कोणतेही उत्तर दिलेले नाही. तर काँग्रेस, समाजवादी पार्टी, आम आदमी पार्टी, सीपीएम आणि बसपासह १५ पक्षांनी विरोध केला होता. तर झारखंड मुक्ती मोर्चा, टीडीपी, इंडियन युनियन मुस्लिम लीगसह १५ पक्षांनी कोणतेही उत्तर दिले नाही.

### चांद्रयान-४ मोहिमेसाठी दोन हजार १०४ कोटींची तरतूद

केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत चांद्रयान मोहिमेबाबतही केंद्र सरकारने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने आता चांद्रयान-४ या मोहिमेला मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत माहिती दिली आहे. चांद्रयान-४ या मोहिमेसाठी तब्बल एकूण २,१०४.०६ कोटी रुपयांची आवश्यकता असणार असून या निधीला मान्यता देण्यात आल्याचेही अश्विनी वैष्णव यांनी स्पष्ट केले. अंतराळयानाचा विकास आणि प्रक्षेपणासाठी भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) जबाबदार असेल. ही मोहीम आता मान्यता दिल्यानंतर पुढील ३६ महिन्यांत उद्योग आणि शैक्षणिक संस्थांच्या सहभागाने पूर्ण केली जाईल. दरम्यान, कॅबिनेटने शुक्रयान व्हिनस ऑर्बिटर मिशनलाला मंजुरी दिली. चांद्रयान आणि मंगळयान या मोहिमानंतर आता शुक्रावर स्वारी केली जाईल.

## निवडक

### दिल्लीत २१ सप्टेंबरला होणार सरकार स्थापन

**नवी दिल्ली :** अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर आता आतिशी यांच्या नेतृत्वाखाली आम आदमी पक्षाचे सरकार स्थापन होणार आहे. दिल्लीचे उपराज्यपाल व्हीके सक्सेना २१ सप्टेंबरला आम आदमी पक्षाच्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्या आतिशी यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ देतील. यासोबतच आम आदमी पक्षाच्या काही आमदारांनाही मंत्रिपदाची शपथ दिली जाणार आहे.

### जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी मतदान

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान बुधवारी (दि.१८) पूर्ण झाले आहे. अर्टिकल ३७० हटवल्यानंतर पहिल्यांदाच येथे मतदान झाले. निवडणुकीबाबत मतदारांमध्ये प्रचंड उत्साह होता. सकाळपासूनच मतदान केंद्रावर मतदारांची मोठी गर्दी दिसून आली होती. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८.१९ टक्के मतदान झाले. पहिल्या टप्प्यासाठी २४ जागांवर २१९ उमेदवारांनी नशीब आजमावले आहे.

## पाली-खोपोली मार्गावर दुचाकी स्कूलबसला धडकली

### तीन जण जागीच ठार



**पाली : प्रतिनिधी**

पाली-खोपोली राज्य महामार्गावर बुधवारी (दि.१८) दुपारी पाली खोपोली राज्य महामार्गावर कानसळ गावाजवळील नेव्ही कॉलेजसमोर बाईकस्वार स्कूल बसला धडकून अपघात झाला. या अपघातात बाईकवरील तीन जण ठार झाले.

श्रीराज एज्युकेशन सेंटरची स्कुल बस घोटावडे येथून शाळकरी मुलांना पालीकडे घेऊन जात होती. या वेळी पाली बाजूकडून खोपोलीच्या दिशेने वेगाने आलेला बाईकस्वार स्कूल बसला जाऊन धडकला. या बाईकवर तीन जण प्रवास करत होते. या वेळी स्कूलच्या पाठीमागून येणाऱ्या कारच्या डॅश कॅमेऱ्यात ही सर्व थरारक घटना कैद झाली आहे. अपघाताची माहिती मिळताच पाली पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक सचिन निकम, सहायक पोलीस निरीक्षक युवराज सूर्यवंशी आदींसह पोलीस उपस्थित होते. या वेळी पोलिसांसह अपघातग्रस्त मदत टीम, अमित खीस्मतराव आदींचे सहकार्य मिळाले.

याच राज्य महामार्गावर दापोडे गावाजवळ मंगळवारी एनसीसीचे विद्यार्थी घेऊन जाणारी परिवहन महामंडळाची बस व कारचा भीषण अपघात झाला. या वेळी बस बाजूच्या शेतात कलंडली. यामध्ये ४५ विद्यार्थी थोडक्यात बचावले. वाढते अपघात चिंताजनक झाले आहेत, वाहतुकीचे नियम पाळणे आणि वेगावर नियंत्रण ठेवणे गरजेचे असल्याचे यानिमित्ताने बोलले जात आहे.

## उपमुख्यमंत्री फडणवीसांच्या कार्यालयातर्फे आरोग्य शिबिर



**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवसानिमित्ताने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयांतर्गत कार्यरत विशेष वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने मोफत सामुदायिक आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

सामुदायिक आरोग्य शिबिरामध्ये सुमारे १५०० रुग्णालयांचा समावेश असणार आहे. त्याचबरोबर वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, नगरविकास, ग्रामविकास विभाग, धर्मादाय आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, निरामय सेवा फाऊंडेशन, धर्मादाय रुग्णालये, धर्मादाय संस्था, मेडीकल असोसिएशन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि लोकसहभागातून ही आरोग्य शिबिरे होणार आहेत.

झोपडपट्ट्यांमध्ये, वाड्यावस्त्यांवर २५ हजारांहून अधिक शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून सुमारे ४० लाख नागरिकांच्या आरोग्य तपासणीचे ध्येय निर्धारीत केले आहे. १ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०२४ दरम्यान सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० या वेळेत शिबिर सुरू असून याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.



## अलिबाग नवेदरबेलीत शेकापला खिंडार

### ■ ग्रामस्थांचा भाजपमध्ये प्रवेश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नवेदरबेली ग्रामस्थांनी नुकताच भाजप पक्षामध्ये पक्ष प्रवेश केला, भाजपचे सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते यांचे नेतृत्वावर विश्वास ठेवीत नवेदरबेली ग्रामस्थांनी शेकापला सोडचिठ्ठी दिली, त्यामुळे नवेदरबेलीमध्ये शेकापला खिंडार पडले.

अलिबागनजीक ढवर ग्रामपंचायत हद्दीत नवेदरबेली येथील ग्रामस्थांचा भाजप पक्ष प्रवेश कार्यक्रम नुकताच झाला. या वेळी अ‍ॅड. मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती. ऐन गणेशोत्सवामध्ये अ‍ॅड. मोहिते यांचे जल्लोषात स्वागत नवेदरबेली ग्रामस्थांनी केले. नवेदरबेली येथील गणपतींचे अ‍ॅड. मोहिते यांनी विसर्जनापूर्वी घरोघरी जाऊन दर्शन घेतले व तेथील ग्रामस्थांशी संवाद साधला. नवेदरबेलीमधील ग्रामस्थ व युवावर्ग यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबध्द असल्याचे सांगितले व तेथील विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

नवेदरबेली येथील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने भाजपमध्ये पक्ष प्रवेश घेतला. या वेळी मोहिते यांनी त्यांचे भाजपमध्ये स्वागत केले.

## रायगड जिल्ह्यात लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप



**अलिबाग : प्रतिनिधी**

भव्य मिरवणूका, गुलालाची उधळण, संगीताच्या तालावर थिरकणारी तरूणाई आणि गणपती बाप्पा मोरयाचा अखंड जयजयकार अशा भक्तीमय वातावरणात मंगळवारी (दि.१७) भक्तांनी आपल्या लाडक्या गणरायाला निरोप दिला.

गणरायाला पुढल्या वर्षी लवकर येण्याचे निमंत्रण देत त्याचे साश्रुपूर्ण नयनांनी विसर्जन केले. गेली दहा दिवस सुरू असलेल्या चैतन्य सोहळ्याची उत्साहात सांगता झाली. अलिबागसह जिल्ह्यात सर्वत्र दुपारपासूनच गणेश विसर्जनाला सुरुवात झाली. जिल्ह्यात अलिबाग, सासवणे, मांडवा, काशिद, श्रीवर्धन, उरण, मुरूड आदी ठिकाणी समुद्रात गणरायांचे विसर्जन करण्यात आले. तर ज्या ठिकाणी समुद्र नाही तेथे तलाव, नद्या, खाड्यांमध्ये गणेशमूर्ती विसर्जित करण्यात आल्या.

घरगुती गणपतींचे विसर्जन आटोपल्यानंतर कार्यकर्ते सार्वजनिक गणपतींच्या विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाले. सार्वजनिक गणपतींच्या विसर्जन मिरवणुकांना सायंकाळी पाच वाजता प्रारंभ झाला. नाशिक बाजा, ढोलताशा या पारंपरिक वाद्यांबरोबच बॅन्जो, ऑर्केस्ट्रा तालावर अबालवृद्ध बेधुंद होवून नाचत होते. निरोप देतांना गुलालाची उधळण सुरू होती. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मिरवणुकीतील झांजपथक सर्वांचेच आकर्षण ठरले. काही ठिकाणी पारंपरिक वेषात नृत्य सुरू होते. ते पाहण्यासाठी भक्तांनी एकच गर्दी केली होती.

समुद्रकिनारी जीवरक्षक आणि बोटी तैनात ठेवण्यात आल्या होत्या. भक्तांच्या स्वागतासाठी खास स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. तेथून भक्तांना आवश्यक त्या सूचना दिल्या जात होत्या. नगरपालिकेतील कर्मचारी या सर्व व्यवस्थेवर जातीने लक्ष ठेवून होते. गणेश भक्तांना जीव रक्षकांकडून गणेशमुर्ती विसर्जनासाठी मदत केली जात होती. सुरक्षित स्थळी नेऊन खोल समुद्रात गणेश मूर्ती विसर्जित केल्या जात होत्या.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात १४४ सार्वजनिक व १७ हजार ३५९ घरगुती गणपतींचे विसर्जन करण्यात आले. विसर्जन व मिरवणुकांदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी अलिबागेत विसर्जनस्थळांकडे जाणार्या सर्व रस्त्यांवरील वाहतूक बंद करण्यात आली होती. गणेश मिरवणूका व पायी जाणारे गणेशभक्तांना प्रवेश दिला जात होता.

आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी गणेशभक्तांनी समुद्रकिनारी गर्दी केली होती. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या विसर्जन मिरवणुका रात्री उशिरापर्यंत सुरू होत्या.

## नवी मुंबईत राज्यातील पहिल्या सेमी कंडक्टर प्रकल्पाचे उद्घाटन



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यातील पहिल्या सेमी कंडक्टर प्रकल्पाचे उद्घाटन बुधवारी (दि.१८) करण्यात आले. नवी मुंबईतील महापे इथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार उपस्थित होते.

आयआरपी इलेक्ट्रॉनिक कंपनीचा हा प्रकल्प आहे. यातून राज्यात दोन टप्प्यांत मिळून तब्बल ३६ हजार ५७३ कोटींची गुंतवणूक केली जाणार आहे. तर पहिल्या टप्प्यात चार हजार नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत. आयआरपी हा मराठी उद्योजकाचा महाराष्ट्रातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने बनवणारा अग्रगण्य समूह असून, या प्रकल्पांतर्गत इस्त्रायल आणि स्पेनमधील कंपन्यांचाही सहभाग आहे.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात २४ हजार ५३८ कोटी एवढी गुंवतणूक करण्यात येणार आहे. राज्यात उद्योग क्षेत्राला कॅपिटल सबसिडी आहे. रेड कार्पेट सुविधा आहेत. एक खिडकी योजना असल्यामुळे उद्योग क्षेत्र विकसित होत आहे. एमएमआर क्षेत्रच नव्हे तर गडचिरोलीसारख्या भागातही औद्योगिक क्षेत्र विस्तारत असल्याचेही मुख्यमंत्री शिंदे या वेळी म्हणाले. (पान २ वर..)

# पनवेलमध्ये भावपूर्ण वातावरणात गणपतींना निरोप

## महापालिकेतर्फे विसर्जन ठिकाणी सोयीसुविधा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कोमोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात सुमारे सहा हजारांहून अधिक घरगुती व २५०हून अधिक सार्वजनिक गणेश मंडळांच्या दहा दिवसांच्या गणपतींचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. या वेळी विविध विसर्जन ठिकाणी महापालिकेतर्फे गणेशभक्तांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करण्यात आल्या होत्या.

महानगरपालिकेतर्फे गणेशभक्तांच्या सोयीसुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग, पर्यावरण विभाग या आठ विभागांच्या माध्यमातून विसर्जन घाटांवर संपूर्ण तयारी करण्यात आली होती. बांधकाम विभागाच्या वतीने ११० ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली होती. यामध्ये ४१ ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून ६२ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली होती. या ४८ कृत्रिम ठिकाणीही शाडू मातीच्या गणपतींसाठी वेगळे तलाव व प्लास्टर ऑफ पॅरीसच्या गणपतींच्या विसर्जनासाठी वेगळ्या तलावांची सोय करण्यात आली होती. या सर्व विसर्जनाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटिव्ही स्टेज, टॉवरची सोय, टेबल खुर्च्या, लाऊड स्पीकर, निर्माल्य कलश, लाईव्ह जॅकेटची सोय करण्यात आली होती





आयुक्त मंगेश चितळे तसेच अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजीत कारलेकर, उपायुक्त रविकिरण घोडके, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त रूपाली माने, चारही प्रभाग अधिकारी यांनी पालिकेच्या सर्व विसर्जन ठिकाणांना भेटी देऊन व्यवस्थेची पहाणी केली.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा उपक्रमांतर्गत पर्यावरणपूरक गणोत्सवावर भर देण्यात आला. कुंभारवाड्यातील कुंभारांना शाडूच्या मातीचे गणपती करण्यासाठी जुलै महिन्यात मोफत १२ टन शाडूची माती उपलब्ध करुन देण्यात आली होती. शाडू मातीच्या गणपतींसाठी वेगळे तलाव व प्लास्टर ऑफ पॅरीसच्या गणपतींच्या विसर्जनासाठी वेगळ्या तलावांची सोय करण्यात आली होती.

यावर्षी महापालिकेच्या वतीने निर्माल्य रथाची अभिनव मोहीम राबविली. यामध्ये दहा दिवस सार्वजनिक गणेश मंडळे व विसर्जन ठिकाणचे एकूण १७ टन निर्माल्य गोळा झाले. यापासून धूपकांडी व अगरबत्ती बनविण्यात येणार आहे, तसेच सेंद्रिय खत बनविण्यात येणार आहे.

## उरणमध्ये गणपती बाप्पांना भावपूर्ण निरोप

**उरण : वार्ताहर**

गणेशजयंती ते अनंतचतुर्थी या दहा दिवसांचा मुक्काम करून गणपती बाप्पांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

गणेशमूर्ती विसर्जनाकरिता नगर परिषदेच्या वतीने मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विमला तलाव, भोवरा तलाव, मोरा बंदर येथे नियोजन करण्यात आले. विमला तलावाच्या प्रवेशद्वाराजवळ मुख्याधिकारी समीर जाधव, नगर अभियंता निखील ढोरे, कर अधिकारी संजय डापसे, स्वच्छता निरीक्षक हरेश तेजी आदींनी गणेशमूर्तींवर पुष्पवृष्टी करून सर्वांचे स्वागत करण्यात आले. विमला तलाव येथे घरगुती १०९ तर सार्वजनिक आठ गणपतींचे विसर्जन करण्यात आले .

प्रमुख विसर्जन स्थळी स्वागत कक्षाची स्थापना करण्यात आली होती. विसर्जन निर्विघ्नपणे व्हावे याकरिता गणपती विसर्जन मित्र मंडळ उरण देवूळवाडीचे सर्व सदस्याांनी मेहनत घेतली.



विमला तलाव येथे प्रशासन अधिकारी अनिल जगधनी, नरेंद्र उभारे, संजय परदेशी, आकाश कवडे, संदेश शिरकुलकर, हर्षद कांबळे, विशाल गायकवाड, कामगार मुकादम, नागरी संरक्षण दलाचे सहाय्यक उपनियंत्रक शशिकांत शिरसाट व १० स्वयंसेवक, वाहनचालक संजय नांदगावकर, अनिरूद्ध अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटचे २७ कार्यकर्ते, पोलीस उपस्थित होते.

## मोहोपाड्यात मोफत आरोग्य शिबिर

**मोहोपाडा :** शिवाजी चौकातील सार्वजनिक गणेशोत्सव राजवाडा मित्र मंडळ रसायनी व शुश्रुषा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ईसीजी, एसपीओ, बिपी, रक्तशर्करा आदी मोफत तपासण्या करण्यात आल्या. या शिबिराचा रसायनी परिसरातील १६२ नागरिकांनी लाभ घेतला.









**पनवेल : आदई ग्रामपंचायतीचे सदस्य श्रीचन भंडारी यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते अशोक गायकर, तालुका सरचिटणीस भपेंद्र पाटील, आदई पं. स. युवा मोर्चा अध्यक्ष निलेश पाटील, राजेश काकडे, ज्ञानेश्वर पाटील आदी उपस्थित होते.**

## ईद-ए-मिलादनिमित्त रक्तदान शिबिर

**पनवेल : वार्ताहर**

ईद-ए-मिलादनिमित्त तळोजा फेज १ सेक्टर २ येथील मदरसा ए आयशा मस्जिद येथे मुस्लिम बांधवांनी सर्वश्रेष्ठ दान रक्तदान या संकल्पनेतून उपक्रम यशस्वी केला.

रक्तदात्यांच्या स्तुत्य कार्य समाजाला प्रोत्साहन व प्रेरणादायी ठरत असल्याने या वेळी त्यांचे सत्कार व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात अल्पसंख्याक नेत्या सुलताना चांद बीबी वंशज ज्येष्ठ समाजसेविका अनिशा शेख यांनी उपस्थिती दाखवत रक्तदात्यांचे प्रशस्तीपत्रक देऊन कौतुक केले व सर्वांना ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा दिल्या.

आयोजक म्हणून अफरोझ भाई, नियाझुद्दीन नडवी, दिलावर चौगुले, गुल्फाम पारकर, सलीम दलवी, शोएब सुर्वे, माजदार मुलाजी, हाजी सलीम रतांशी, नौफिल सय्यद तसेच एमजीएम श्रीसाई ब्लड सेंटर सदस्य व अल्पसंख्याक समाज यांनी शिबिरात सहभाग घेतला.



# मोहोपाड्यात गणरायाचे साश्रूनयनांनी विसर्जन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सर्वत्र लाडक्या बाप्पांचे शनिवारी तालुक्यासह जिल्ह्यात मोठ्या जल्लोषात स्वागत झाले. दहा दिवसांचा पाहूणचार घेतल्यानंतर आपल्या लाडक्या बाप्पाचे मोहोपाडा परिसरात साश्रूनयनांनी विसर्जन करण्यात आले.



बाप्पाचे विसर्जन करताना पावसाने उसंत घेतल्याने मोहोपाडा तलाव, पाताळगंगा नदी, रिस पूल, वावेघर घाट, गुळसुंदे आदी ठिकाणी वाजत-गाजत गणरायाला निरोप देण्यात आला. श्रीगणेशचतुर्थीपासून बाप्पाचे ठिकठिकाणी स्वागत झाले. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...असा जयघोष करीत दहा दिवसांच्या गणरायाला भक्तीमय वातावरणात निरोप देण्यात आला.

बाप्पाची विसर्जन मिरवणूक निर्विघ्नपणे पार पाडली जावी, यासाठी खबरदारीही भाविक घेत होते.

विसर्जनात अनुचित प्रकार घडू नये, यासाठी रसायनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त लावण्यात आला होता, तसेच विसर्जनस्थळी स्वयंसेवक सज्ज होते.





**पनवेल : स्वयंहाय्यता महिला मंडळ रोजबाजार भाजीमार्केटच्या वतीने मनपाचे निरिक्षक महेंद्र भोईर, सफाई पर्यवेक्षक शुभम धाडवट, सनी बेद, कामगार भिमेश गायकवाड, सुनील गवली, अरुण गायकवाड, अंकुश सोनावणे, शिवनाथ वाघमारे, भावेश कांबळे, राज कांबळे, सुनील धोत्रे यांचा सत्कार मंडळाच्या अध्यक्ष माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते करण्यात आला.**

## एनआय शाळेतर्फे स्वच्छता अभियान

**उरण : प्रतिनिधी**

शहरातील जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे एनआय उरण या शाळेमधील आरएसपी व स्काऊट-गाईड विद्यार्थ्यांकडून विमला तलाव परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. विमला तलावासमोरील सर्व कचरा साफ केला. या प्रसंगी शाळेतील शिक्षक, आरएसपी विद्यार्थी, स्काऊट-गाईड विद्यार्थी, सोमीनाथ खरमाटे, मुकद्दर तडवी आदींनी या उपक्रमात सहभाग घेतला होता.



## पनवेलमध्ये जुलूसनिमित्त धार्मिक सलोख्याचे अनोखे रूप

**पनवेल : वार्ताहर**

इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मुहम्मद पैगंबर यांचा जन्मदिन ईद-ए-मिलाद म्हणून देशभरात मुस्लिम बांधव उत्साहात साजरा करतात. या वेळी जुलूस अर्थात मिरवणूक काढण्यात येते. या वर्षी ईद-ए-मिलादचे दिवशी गणेशोत्सवातील नववा दिवस होता. त्यामुळे हजरत पीर जमाल शहा तरजरी कुददुस दर्गा समितीतर्फे बुधवारी (दि.१८) जुलूस काढण्यात आला.

पनवेल परिसरातील तक्का येथील पीर जमाल शहा बाबा दर्गाह येथून जुलूस काढण्यात आला. या जुलूसमध्ये भाजपचे महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक मोर्चाचे उपाध्यक्ष सय्यद अकबर, पनवेल वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे आणि दर्गाह ट्रस्टचे मुख्य विश्वस्त जावेद इब्राहिमफकीर मुजावर यांच्यासह मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.



या वेळी नितीन ठाकरे म्हणाले, किइस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्ताने काढण्यात येणारा जुलूस आपण गणेशोत्सवानंतर काढावा हा निर्णय घेतल्याबद्दल मी दर्गाह विश्वस्त समितीचे आभार मानतो.

उपाध्यक्ष सय्यद अकबर म्हणाले, किया जुलूसचे निमित्ताने इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मुहम्मद पैगंबर यांनी आपल्याला जो मानवतेचा संदेश दिला आहे त्याचा आपण प्रचार करणार आहोत. इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मुहम्मद पैगंबर यांची शिकवण आपण जगलो पाहिजे, अशी सय्यद अकबर यांनी अपेक्षा व्यक्त केली.

हजरत पीर जमाल शहा तरजरी कुददुस दर्गा समितीचे मुख्य विश्वस्त जावेद इब्राहिमफकीर मुजावर यांनी नितीन ठाकरे व त्यांचे सारे सहकारी करीत असलेल्या सहकार्याबद्दल पोलीस दलाचे आभार मानले. हजरत पीर जमाल शहा तरजरी कुददुस दर्गा येथूल जुलूसला प्रारंभ करण्यात आला. तेथून रेल्वे स्टेशन मार्गे तक्कागाव येथे जुलूसचे आगमन झाले. जुलूसचे दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे सन्मानाने स्वागत करण्यात आले. त्यानंतर पुन्हा पीर जमाल शहा बाबा दर्गा येथे आल्यावर जुलूसची सांगता करण्यात आली.

## नवीन पनवेलमध्ये गौरा गणपती सार्वजनिक उत्सवाचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील अस्मिता कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ आणि प्रियदर्शनी महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.२१)गौरा गणपती सार्वजनिक उत्सव आयोजित करण्यात आला आहे.

नवीन पनवेलमधील सेक्टर १७, पीएल ५३१ येथे होणाऱ्या या उत्सवात शनिवारी सकाळी १० वाजता श्रींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना पूजन व आरती, रात्री ८ ते ११ वा.दरम्यान लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम व महाप्रसाद आयोजित करण्यात आले असून रविवारी सायंकाळी ५ वा. श्री गणेश विसर्जनाची भव्य मिरवणूक असणार आहे. या उत्सवाचा जास्तीत जास्त भक्तगणांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उत्सवाच्या आयोजिका माजी नगरसेविका सुशीला जगदिश घरत व डॉ. अस्मिता घरत यांनी केले आहे.



**उलवे नोड : उलवे उपसरपंच जगदीश खारकर यांना वाढदिवसानिमित्त वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, निलेश खारकर, धीरज ओवळेकर, दीपक गोंधळी, विक्रम कोळी, अभी दापोलकर, प्रिया अडसूळ, सुहास गोंधळी, शैलेश भगत, रविकांत म्हात्रे, विनोद ठाकूर, गोपी भोईर, मनोज नाईक यांनी शुभेच्छा दिल्या.**

## संपादकीय

# आश्वासनाची पूर्तता

दीर्घकाळ चर्चेत असलेल्या 'एक देश, एक निवडणूक' या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरी दिली. देशात सर्व राज्यांमध्ये लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी व्हाव्यात या संकल्पनेवर हा प्रस्ताव आधारित आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळाला शंभर दिवस पूर्ण झाल्यानंतर हा निर्णय घेऊन मोदी सरकारने निवडणूक जाहीरनाम्यातील आपले आश्वासन पूर्ण केले आहे. भारतीय जनता पक्षाला या प्रस्तावाबाबत इतर राजकीय पक्षांकडूनही पाठिंबा मिळण्याची अपेक्षा आहे.

**देशात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेऊन, विविध ठिकाणी वेगवेगळ्या वेळी निवडणुका घेण्यासाठी होणारा आर्थिक खर्च कमी करण्याच्या प्रमुख उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने 'एक देश, एक निवडणूक' या प्रस्तावाला बुधवारी मंजुरी दिली. निवडणुकांवरील खर्च कमी करण्यासोबतच, वारंवार प्रशासकीय स्थैर्यात निर्माण होणारे अडथळे, सुरक्षा दलांच्या तैनातीतील अडचणी आणि राजकीय पक्षांचा आर्थिक खर्च लक्षात घेऊन मोदी सरकार 'एक देश, एक निवडणूक' योजनेचा विचार करत आहे. देशात १९५१-५२ मध्ये लोकसभा आणि सर्व राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी झाल्या. यानंतर १९५७, १९६२ आणि १९६७ मध्ये लोकसभा आणि सर्व विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी झाल्या, परंतु १९६८-६९ मध्ये काही विधानसभांचे मुदतपूर्व विसर्जन आणि १९७० मध्ये लोकसभा मुदतीपूर्वी विसर्जित झाल्यामुळे एकाच वेळी निवडणुका घेण्याची परंपरा बंद झाली. तेव्हापासून आतापर्यंत देशात दरवर्षी कुठे ना कुठे निवडणुका होत असतात. अशा परिस्थितीत मोदी सरकार पुन्हा एकदा लोकसभा आणि सर्व विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या शक्यतेवर विचार करत आहे. गेल्यावर्षी सप्टेंबर महिन्यात सरकारने यासंदर्भात विचार करण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली होती. तेव्हाही, आधी बेरोजगारी, महागाई यांसारखे प्रश्न सोडवण्याऐवजी आताच या प्रस्तावाची गरज काय, असे म्हणत काँग्रेस पक्षाने शंका-कुशंका उपस्थित केल्या. कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने आपला अहवाल मार्च २०२४ मध्ये केंद्राला सोपवला. त्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मंजुरी दिली. काँग्रेस पक्षाने अर्थातच आताही या प्रस्तावावर टीकाच केली आहे. हा प्रस्ताव अव्यवहार्य आणि लोकशाहीशी विसंगत असल्याचे काँग्रेस पक्षाने म्हणणे आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी ही योजना म्हणजे निव्वळ जनतेचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले आहे. अशा योजनांच्या अंमलबजावणीमुळे लोकशाहीला धोका निर्माण होऊ शकतो आणि राज्यांच्या स्वतंत्र निर्णय घेण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो असा नेहमीचाच रागही त्यांनी आळवला आहे. म्हणजेच या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी काँग्रेसकडे कोणताही ठोस मुद्दा दिसत नाही. दरम्यान, मंत्रिमंडळाने मान्यता दिल्यानंतर हा कायदा केव्हापासून लागू होईल याकडे देशाचे लक्ष लागले आहे. स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एकाच वेळी निवडणुका घेण्याचे प्रबळ समर्थक मानले जातात. मोदी यांनी अलीकडेच स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात विधानसभा आणि संसदीय निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या प्रस्तावाचा उल्लेख केला होता. अयोध्येत राममंदिराची उभारणी, जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० रद्द करणे आणि नागरिकत्व दुरुस्ती कायद्याची अंमलबजावणी यांसारख्या आपल्या जाहिरनाम्यातील प्रमुख मुद्यांवर दिलेली आश्वासने मोदी सरकारने यापूर्वीच पूर्ण केली आहेत.**

# पोलादपुरात शाश्वत शेती, कीडरोग व्यवस्थापनाचे प्रबोधन



पोलादपूर तालुक्यातील तालुका कृषी विभागामार्फत काही वर्षांपूवी पाणलोट विकास कार्यक्रम राबविताना मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्यानंतर या विभागाची जनमानसात तसेच शेतकऱ्यांमध्ये प्रतिमा मलीन झाली होती. त्याकाळी भ्रष्टाचाराच्या पार्श्वभूमीवर दोन अधिकाऱ्यांसह सात कर्मचारी निलंबित करण्यात आले होते. आता ही प्रतिमा स्वच्छ करण्यासाठी तालुका कृषी अधिकारी सूरज पाटील यांच्यासह सर्वच कर्मचारी करीत असलेली मेहनत पोलादपूर तालुक्यातील शेतकरीबहुल जनतेमध्ये प्रशंसनीय झाली असल्याचे दृश्य पाहावयास मिळत आहे.

गोळेगणी येथील जननी रामेश्वर शेतकरी गट पाहणी व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रायगड आत्मा संचालक शिवाजी भांडवलकर, तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील, शेतकरी गट अध्यक्ष प्रकाश मोरे, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, कृषी सहाय्यक मनोज जाधव, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक कपिल पाटील, कृषी मित्र नामदेव येरुणकर, ग्रामरोजगार सेवक शेखर येरुणकर, अनिकेत मोरे, प्रगतशील शेतकरी राजेंद्र दळवी, दीपक सुर्वे आदी शेतकरी उपस्थित होते.

स्वत:च्या कुटुंबाच्या आरोग्यासाठी तरी सेंद्रिय मालाचे उत्पादन घेतले पाहिजे तरच आपले आरोग्य उत्तम राहील, असे प्रतिपादन आत्मा रायगड प्रकल्प संचालक शिवाजी भांडवलकर यांनी पोलादपूर तालुक्यातील गोळेगणी येथे केले. शाश्वत शेतीसाठी सेंद्रिय शेती काळाची गरज बनली असल्याचा दावाही भांडवलकर यांनी या वेळी केला.

रायगड आत्मा प्रमुख प्रकल्प संचालक शिवाजी भांडवलकर यांनी पोलादपूर तालुक्यातील देवपूरवाडी येथील डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत गटातील प्रगतशील शेतकरी संजय नाना पवार व ज्ञानेश्वर धोंडू पवार यांची सेंद्रीय हळद लागवड, नाचणी, भात प्रात्यक्षिकाची पाहणी व मार्गदर्शन केले. परंपरागत कृषी विकास योजना सेंद्रीय शेती अंतर्गत स्थापित जननी रामेश्वर शेतकरी गट गोळेगणी पाहणी करून जीवामृत बिजामृत, दशपर्णी अर्क करता ड्रमचे वाटप केले.

या वेळी नामदेव दगडू येरुणकर, प्रकाश गोपाळ येरुणकर, अविनाश सखाराम येरुणकर, सागर गोपाळ मोरे, यांनी तयार केलेल्या जलकुंड पाहणी करून त्यावर आधारित फळबाग लागवड व परस बागेतील भाजीपाला लागवड पाहणी केली. रायगड आत्मा प्रमुख प्रकल्प संचालक भांडवलकर यांनी राज्यामध्ये रासायनिक खतांच्या व कीटकनाशकांच्या असंतुलित वापरामुळे जमिनीचा पोत खराब होत आहे. कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे नागरिकांच्या आरोग्यांच्या समस्यादेखील मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. यावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी सेंद्रीय शेतीकडे वळावे, नागरिकांनीदेखील सेंद्रिय भाजीपाला सेवन करावे, विविध फळेदेखील सेंद्रीय पध्दतीने लागवड होऊन तयार झाल्याची खात्री करून खावीत, शेतकऱ्यांकडे सेंद्रीय पध्दतीच्या कृषी उत्पादनाची मागणी वाढल्यास शेतकरीदेखील सेंद्रीय पध्दतीने शेती करण्यासाठी प्रवृत्त होतील, असे मत या वेळी व्यक्त केले.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

अतिपाऊसानंतर अचानक हवामानातील बदलामुळे भात पिकावर रोग व कीड प्रादुर्भाव अन्नद्रव्यांचे कमतरता दिसत असून कुडपण खुर्द येथे काही प्रमाणात निळे भुंगेरे किड व सुक्ष्म अन्नद्रव्ये कमतरता आढळून आल्या होत्या. त्याअनुषंगाने उपविभागीय कृषी अधिकारी जितेंद्र रणवरे यांचे उपस्थितीत तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांचे मार्गदर्शनाखाली क्रॉपसॅप अंतर्गत रोग व कीड व्यवस्थापन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन कुडपण खुर्द येथे करण्यात आले होते.

पोलादपूर तालुक्यात भात पिकावर निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव मागील तीन-चार वर्षांपासून दिसून येत आहे. दापोली कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून तालुका कृषी अधिकारी कार्यालय पोलादपूर ह्या किडीविषयी गावोगावी जनजागृतीचे कार्यक्रम करत असून देशभर दुय्यम समजली जाणारी निळे भुगेरे ही कीड पोलादपूर तालुक्यातील काही गावांची डोकेदुखी ठरत आहे. प्रतिबंधक उपाययोजनेमध्ये हि निळे भुंगेरे कीड भात पिकानंतर बांधावरील गवतावर आणि भाताच्या फुटव्यांवर उपजीविका करते आणि पुढील हंगामात भात पिकास उपद्रव करते. त्यासाठी भात लागवडीनंतर बांध स्वच्छ ठेवावेत. शेतात पाणी जास्त काळ न साठता निचरा होईल याची काळजी घ्यावी, असे मत उपविभागीय कृषी अधिकारी जितेंद्र रणवरे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

निळे भुंगेरे ही कीड भात पीक फुटव्याच्या अवस्था आणि पसवण्यापूर्वी होतो. पाणथळ जमीन आणि नत्रयुक्त खताच्या अतिरिक्त वापरामुळे या किडीचा प्रादुर्भाव वाढत आहे एकात्मिक कीड व्यवस्थापन करणे ही काळाची गरज असल्याचे मत तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांनी केले. कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे यांनी तपकिरी तुडतुडे, लष्करी अळी प्रतिबंधक उपाय योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी फवारणी स्प्रेयर पंपाद्वारे सूक्ष्म अन्नद्रव्य फवारणीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. साई हायटेक ॲग्रो एजन्सीद्वारे ग्रामस्थांना बॅटरी ऑपरेटर पंप मोफत देण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय कृषी अधिकारी जितेंद्र रणवरे, तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, कृषी सहायक मनोज जाधव, संग्राम साळुंखे, माजी सरपंच हनुमंत शेलार, मंगेश चिकणे प्रमुख मार्गदर्शक कृषी प्रगतशील शेतकरी ज्ञानोबा शेलार, ग्रामपंचायत सदस्य महादेव शेलार, शिवाजी शेलार आदी उपस्थित होते.

हवामानातील बदलामुळे पोलादपूर तालुक्यातील कापडे परिसरामध्ये भात पिकावर कीड व रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्यादृष्टीने क्रॉपसॅप अंतर्गत किनेश्वर व कापडे बुद्रुक येथे गाव बैठक व क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले.

पोलादपूर तालुक्यातील कापडे परिसरामध्ये निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. निळे भुंगेरे ही भातावरील दुय्यम कीड समजली जाणारी आज प्रमुख कीड बनली आहे त्या अनुषंगाने कृषी विज्ञान केंद्र, रोहा येथील शास्त्रज्ञ जीवन आरेकर यांनी शेतकऱ्यांना भात पिकावरील विविध कीड व रोग यांची ओळख व व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. या वेळी कृषि पर्यवेक्षक रवींद्र गुंड व कृषी सहाय्यक मोनिका पिसाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन कृषी सहाय्यक कोमल कचरे यांनी केले.

सध्या भात फुटव्याच्या अवस्थेत आहे. पाणथळ किंवा दलदलयुक्त जमीन आणि नत्र खतांच्या अतिरिक्त वापरामुळे निळे भुंगेरेचा प्रादुर्भाव वाढत आहे. ही कीड बांधावरील गवतावर आपली उपजीविका करत असल्याने बांध स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे. तसेच भात पिकाची दाट लागवड करू नये अशा सूचना शेतकऱ्यांना करण्यात आल्या. भुंगे गर्द निळ्या रंगाचे असून अळी भुरकट पांढऱ्या रंगाची असते. भुंगेरे पानाच्या वरच्या पृष्ठभागावरील हरितद्रव्य खातात तर अळ्या पान पोखरून करून आतील हरितद्रव्य खातात. पानांवर समांतर पांढरे रेषा उमटलेल्या दिसतात. हळूहळू या रेषा एकमेकात मिसळतात व त्या ठिकाणी पांढरा पट्टा तयार होतो. नंतर हे पट्टे तपकिरी पडून पाने करपल्यासारखी दिसतात. रोपे सुकतात व वाढथांबून लोंब्या बाहेर येत नाहीत. अशा काळामध्ये पिकावर रासायनिक नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही) २० मिली किंवा ट्रायझोफॉस (४० टक्के प्रवाही)१२.५ मिली किंवा लॅमडा सायहॅलोथ्रीन (५ टक्के प्रवाही) ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी, असे मार्गदर्शन तालुका कृषी कार्यालयामार्फत करण्यात आले.

## बदलते तंत्रज्ञान

# 'ॲमेझॉन'चा ग्रेट इंडियन सेल उद्यापासून; खरेदीसाठी पर्वणी

फ्लिपकार्ट व ॲमेझॉनमध्ये अनेकदा सेलसंबंधित स्पर्धा पाहायला मिळते. काही दिवसांपूर्वी फ्लिपकार्टने आपल्या बिग बिलियन डेज सेलची घोषणा केली होती, तर आता ॲमेझॉनने आपला यंदाचा सर्वांत मोठा सेल म्हणजे ग्रेट इंडियन सेलची घोषणा केली आहे.




ॲमेझॉनचा हा सेल २० सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. तसेच ॲमेझॉन इंडियाने आगामी सेलदरम्यान डिस्काउंटवर उपलब्ध असणाऱ्या स्मार्टफोन्सच्या नावांची यादी जाहीर केली आहे. चला तर नक्की कोणत्या वस्तूंवर किती सूट असणार आहे हे आपण या बातमीतून सविस्तर जाणून घेऊ

ॲमेझॉनने जाहीर केल्यानुसार त्यांच्या ॲमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल २०२४ सेल इव्हेंटमध्ये वनप्लस ११ आर, वनप्लस १२, वनप्लस १२ आर, वनप्लस नॉर्ड सीई ४ लाईट, वनप्लस नॉर्ड सीई ४, रिअलमी नाझरो ७० प्रो व रिअलमी जीटी ६ टी, तर आयक्यूओओ झेड ९ प्रो, आयक्यूओओ झेड ९ लाईट, आयक्यूओओ झेड ९ प्रो, आयक्यूओओ १२, गॅलेक्सी एस २४ अल्ट्रा, गॅलेक्सी एम १५ आदी स्मार्टफोन्सवर भरघोस सूट मिळणार आहे.

शाओमी फोन घेण्यास इच्छुक असलेल्या ग्राहकांना या सेलमध्ये डिस्काउंट देण्यात येईल. या सेलमध्ये शाओमी १४ सीव्ही, रेडमी १३, रेडमी नोट १३, शाओमी १४ आदी आणि टेक्नो, ऑनर, ओपो व विवो या विविध कंपन्यांचे फोनदेखील खरेदीसाठी उपलब्ध असतील. मेझॉनच्या या सेलमध्ये मोबाईल ॲक्सेसरीजवर ८० टक्के सूट देण्यात येईल. त्यामध्ये वायरलेस टीडब्ल्यूएस इयरफोन जसे की वनप्लस नॉर्द बड्स २आर, सोनी सी७००, पॉवर बँक, चार्जर, चार्जिंग केबल्स आदींचा समावेश असेल, तर लॅपटॉवर ४० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येईल.

याव्यतिरिक्त वॉशिंग मशीनवर ६० टक्के, फ्रिज व एअर कंडिशनरवर ५५ टक्के, तर मायक्रोवेव्हवर ६५ टक्के, स्मार्ट टीव्हीवर ६५ टक्के सूट देण्यात येणार आहे. ॲमेझॉनच्या प्रत्येक सेलप्रमाणे या सेलमध्येही प्राइम मेंबर्सना एक दिवस आधीच सर्व ऑफर्सचा फायदा घेता येईल. जर तुम्ही नवीन गॅझेट, खासकरून स्मार्टफोन घेण्याचा विचार करीत असाल, तर आगामी ग्रेट इंडिया फेस्टिवल सेल तुमच्यासाठी योग्य वेळ ठरू शकते. तुम्ही डिस्काउंटसह तुमच्या आवडत्या, गरजेच्या वस्तू या सेलमध्ये खरेदी करू शकणार आहात.

# भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स

नासा अर्थात अमेरिकन अंतराळ संशोधन संस्थेच्या माध्यमातून अंतराळात जाणाऱ्या भारतीय वंशाच्या दुसऱ्या महिला सुनीता विल्यम्स यांचा आज जन्मदिवस आहे. त्यांचा जन्म १९ सप्टेंबर १९६५ रोजी युक्लिड, अमेरिका येथे झाला होता. त्यांनी महिला अंतराळवीर म्हणून १९५ दिवस अंतराळात राहण्याचा विक्रमदेखील केला आहे.

मेसेच्युसेट्स येथून शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर सुनिता विल्म्यस यांनी १९८८मध्ये संयुक्त राष्ट्राच्या नौदल अकॅडमीमधून फिकिल सायन्समध्ये पदवी घेतली. त्यानंतर १९९५मध्ये फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीतून इंजिनिअर मॅनेजमेंटमध्ये एमएस केले. त्यांचे वडील दीपक पांड्या हे प्रसिद्ध डॉक्टर आहेत. ते गुजरातचे आहेत. त्यांच्या वडिलांनी १९५८मध्ये अमेरिकेत जाण्याचा निर्णय घेतला होता.

जून १९९८मध्ये सुनीता यांची नासामध्ये निवड झाली आणि प्रशिक्षण सुरू झाले. त्यांनी आतापर्यंत ३० वेगवेगळ्या अंतराळयानांमध्ये २७७० वेळा भरारी घेतली आहे. सप्टेंबर २००७मध्ये त्यांनी भारत दौरादेखील केला होता. सुनीता या सोसाइटी ऑफ एक्सपेरिमेंटल टेस्ट पायलट्स, सोसाइटी ऑफ फ्लाइट टेस्ट इंजिनिअर्स आणि अमेरिकी हॅलिकॉप्टर असोसिएशन या संस्थांशी देखील जोडलेल्या आहे.



**निमित्त**

सुनीता यांचा विवाह मायकल जे विलियम्स यांच्याशी झाला असून तेदेखील अंतराळ क्षेत्राशी निगडीत आहेत. सुनिता यांना २००८मध्ये भारत सरकारकडून विज्ञान आणि अभियांत्रिक क्षेत्रातील कामगिरीसाठी पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले आहे. त्यांना आतापर्यंत नेव्ही कमेंडेशन मेडल (२), नेव्ही अँन्ड मरीन कॉर्प अचिव्हमेंट मेडल, ह्यूमॅनिटेरियन सर्विस मेडल अशा विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

अंतराळात जाणाऱ्या सुनीता या भारतीय वंशाच्या दुसऱ्या महिला असून अंतराळाची ओढ असणाऱ्या तरूणाईसाठी त्या एक प्रेरणास्रोत आहेत. दरम्यान, २०१२मध्ये सुनीता आंतरराष्ट्रीय इंटरनेशनल स्पेस स्टेशनच्या प्रवासादरम्यान अंतराळात ट्रायथलॉन पूर्ण करणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. यादरम्यान, त्यांनी वेट लिफ्टिंग मशीन वापरून पोहण्याची नक्कल केली आणि हार्नेसला बांधलेल्या ट्रेडमिलवर धावल्या होत्या.

अमेरिकी अंतराळ संस्था नासामध्ये कार्यरत असणाऱ्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांनी दुसऱ्यांदा अंतराळात भरारी घेतली आहे. त्यांचे सहकारी बुच विल्मोर यांच्यासह बोइंगच्या स्टारलाइनर अंतराळयानातून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकामध्ये ५ जून रोजी (आयएसएस) पोहचले, परंत, आता सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर पुन्हा पृथ्वीतलावर केव्हा परतणार याबाबत नासाने कोणतीही माहिती दिलेली नाही. स्टारलाइनर या त्यांच्या यानात हीलिअम गळती झाल्याने त्यांचा परतीचा प्रवास रखडला असल्याची चर्चा आहे.

नासामधील भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकावर अडकले आहेत. त्यांच्या यानात बिघाड झाल्याने दोघांचाही परतीचा प्रवास लांबला आहे. दोन्ही अंतराळवीर २०२४च्या अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकीपूर्वी पृथ्वीवर परत येणार नाहीत, परंतु असे असले तरी दोन्ही अंतराळवीरांना अंतराळस्थानकातून मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : दहा दिवसांच्या बाप्पांचे मनोभावे विसर्जन करण्यात आले. त्याचे सुधीर नाझरे यांनी ड्रोनच्या सहाय्याने घेतलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# शरीरातील पाणीपातळीची योग्य पद्धत जाणून घ्या

आपल्या शारीरिक आरोग्यासाठी पाणी महत्त्वाचे आहे, असे लॉर्ड्स मार्क बायोटेकच्या पोषणतज्ज्ञ सांची तिवारी यांनी दी इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले. सांची यांनी शरीरातील पाण्याचा पातळी (हायड्रेटेड) राखण्याच्या महत्त्वावर भर दिला आणि पिण्याच्या पाण्याबद्दलचे सामान्य गैरसमज स्पष्ट केले.



दिवसभरात आठ ग्लास पाणी प्यायले पाहिजे, असा नियम आहे आणि तुमच्या शरीराला कधी पाण्याची गरज आहे हे कळते. तुम्हाला तहान लागल्याचे संकेत ओळखा. कारण- तो तुमच्या शरीरात पुरेशी पाण्याची पातळी राखण्याचा नैसर्गिक मार्ग आहे, असे तिवारी यांनी सांगितले

व्यायाम : व्यायाम किंवा गरम हवामानात जास्त घाम येतो? त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये अधिक पाणी प्या. जास्त शारीरिक हालचालींमुळे घामाद्वारे शरीरातील द्रवाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे अधिक पाणी पिणे आवश्यक आहे.

वय : लहान मुले आणि वृद्धांच्या शरीरातील पाण्याची पातळी राखण्याकडे जास्त लक्ष देण्याची आवश्यकता असू शकते. कारण- तहान लागल्याचे संकेत त्यांच्या पटकन लक्षात येत नाहीत.

वैद्यकीय स्थिती : मधुमेह किंवा मूत्रपिंडाच्या समस्यांसारख्या काही वैद्यकीय परिस्थिती द्रवपदार्थाच्या गरजांवर परिणाम करू शकतात. अशा परिस्थितीत डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

ज्या लोकांना खूप घाम येतो त्यांच्यासाठी फक्त पाणी पिणे पुरेसे नाही. इलेक्ट्रोलाइटयुक्त पेये किंवा खाद्यपदार्थ घामाद्वारे गमावलेली खनिजे भरून काढण्यास मदत करू शकतात.

शरीरातील पाण्याची पातळी कमी होणे ही चिंताजनक बाब आहे; परंतु गरजेपेक्षा जास्त प्रमाणात पाणी पिणे धोकादायकही असू शकते. तिवारी यांनी स्पष्ट केले की, गरजेपेक्षा जास्त प्रमाणात पाणी पिणे शरीरासाठी चांगले नाही. कारण- ते तुमच्या शरीरातील इलेक्ट्रोलाइट्स वापरते आणि तुमच्या हृदयाच्या गतीवर परिणाम होऊ शकतो.

पाणी अत्यावश्यक असले तरी, इतर पेये आणि खाद्यपदार्थ शरीरातील पाण्याची पातळी वाढवण्यात योगदान देऊ शकतात हे तिवारी यांनी मान्य केले. जसे की- फ्रूटी मिल्क आणि फळांचे रस. त्याव्यतिरिक्त उच्च पाण्याचे प्रमाण असलेली फळे आणि भाज्या शरीरातील पाण्याची पातळी राखण्याचे उत्कृष्ट स्रोत असू शकतात.

# रायगडात गणरायाला निरोप

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड पोलीस ठाण्यांतर्गत अनंत चतुर्दशी गणरायाला ढोल ताशांच्या गजरात वाजत गाजत फटक्यांची आतिषबाजी करत १०९२ गणेशमूर्तींना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

गणेश विसर्जनानिमित्त अनुचित प्रकार घडू नये यासाठी मुरुड शहरांसह पंचक्रोशी भागात पोलिसांच्या फौजफाटा तैनात करण्यात आले आहे. गेल्या पाच दिवसांपूर्वी शहरातील भोगेश्वर पाखाडीतील गौरी गणपती विसर्जन मिरवणूकीवर लहान मुलांकडून दगडफेक करण्यात आली होती. त्यामुळे शहरात तणावाती परिस्थिती निर्माण झाली होती. रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्वतः हा लक्ष घालून शहरात शांतता राहावी यांचे प्रयत्न केले त्याला यश ही आल्याने गणपती बाप्पाचे विसर्जन थाटामाटात झाले.

मुरूड गणपती विसर्जनासाठी मुरूड जंजिरा नगरपरिषदेच्या वतीने शहरातील नाक्या नाक्यावर व समुद्रकिनारी रोषणाई व मुर्ती विसर्जनसाठी जीवरक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच पंचक्रोशीभागातील शिघ्रे नदी, अंबोली नदी विसर्जन जवळ ही ग्रामपंचायत वतीने रोषणाई करण्यात आली आहे.



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव परिसर येथील संगमेश्वर नगरातील दहा दिवसाच्या गणपतींना भावपूर्ण निरोप देत गणपतींचे विसर्जन करण्यात आले.

माणगाव संगमेश्वर नगरात गणरायांचे वाजत-गाजत उत्साहात आगमन झाल्यावर मंगळवारी (दि.१७) अनंत चतुर्दशी दिवशी सायंकाळी संगमेश्वर नगरातील पासूनच दहा दिवसांचे गणपती विसर्जनासाठी बाहेर काढले. या गणरायांच्या विसर्जन मिरवणुकीत जुने माणगाव येथील गणेशभक्त सहभागी झाले होते.

**चौक : प्रतिनिधी**

चौक येथील सार्वजनिक गणरायांना साश्रू नयनांनी निरोप देण्यात आला, गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या आर्त विनवणी करण्यात आली.

चौक बाजार पेठ येथे चार मंडळांचे सार्वजनिक गणपती असतात, त्यापैकी दोन गणपतींना सातव्या दिवशी निरोप देण्यात आला. आदर्श मित्र कोल्हापूर पेठ यांचा आदर्श राजा, वैश समाज यांचा चौकचा राजा आणि संजय कोंडीलकर यांच्या घरगुती अशा तीन गणरायांना अनंत चतुर्दशी दिवशी साश्रू नयनांनी आणि ढोल ताशांच्या गजरात निरोप देण्यात आला.

चौक हे ऐतिहासिक गाव आहे, आदर्श मित्र मंडळ हे अनेक सामाजिक उपक्रम राबवित असते. या दहा दिवसांच्या काळातदेखील शासकीय योजना यांची माहिती, लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आले आहेत. निरोप देण्यापूर्वी महाआरतीचा मान खालापूरचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार व उद्योजक राजेंद्र अगरवाल यांना देण्यात आला.

## ईद ए मिलादच्या निमित्ताने पेण शहरात विविध कार्यक्रम

**पेण : प्रतिनिधी**

यंदा ईद ए मिलाद व अनंत चतुर्दशी एकदिवस मागे पुढे आल्याने रायगडमध्ये १६ तारखेलाच ईद ए मिलादची सुट्टी प्रशासनाच्या वतीने जाहीर करण्यात आली होती. त्या अनुषंगाने पेणमध्ये मुस्लिम समाजाच्या वतीने सोमवार १६ सप्टेंबरला जुलूस काढण्यात आला होता.

ईद ए मिलादनिमित्त खान मोहल्ला येथे रविवारी १५ सप्टेंबर रोजी लहान मुलांचे नातं पठण, प्रवचन, कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते तसेच कसाई मोहल्ला येथे १६ सप्टेंबर रोजी मुलांच्या नातं पठण कार्यक्रम झाले. या वेळी दोन्ही मुस्लिम मोहल्ल्यात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. स्नेहभोजनाचे आयोजनदेखील करण्यात आले होते.

मौलाना हैदरअली यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेल्या जुलूसमध्ये मौलाना अन्सार हजरत, हाफीजी अताऊल रहमान, मौलाना मन्सूर, मौलाना सलाउद्दीन, मौलाना फुरकान, मौलाना जबीर आदींसह खान मोहल्ला, कसाई मोहल्ला, वडगाव, अंतोरे, वडखळ तसेच तालुक्यातून मुस्लिम बांधव, शांतता कमिटी सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे / जमीन मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे मोहो, ता. पनवेल, जि. रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १) श्री. दत्तु विना फडके<br>२) श्री. रामा विना फडके<br>३) श्री. गजानन विना फडके<br>४) श्री. धर्मा विना फडके<br>५) श्री. वामन विना फडके व इतर | २२/५ | ०-४५-०० | ९.१९ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक/भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **१) श्री. दत्तु विना फडके, २) श्री. रामा विना फडके, ३) श्री. गजानन विना फडके, ४) श्री. धर्मा विना फडके आणि ५) श्री. वामन विना फडके व इतर**, यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून **१४ (चौदा)** दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दिनांक :- १८/०९/२०२४**

**सही/-**
**अॅड. अतिश सुनील परदेशी**
**अॅड. हायकोर्ट**
**मोबा नं. ९७०२८९८९८९**
**गाळा नं. ७, फडके नाट्यगृह कॉम्प्लेक्स,**
**श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

### खोपोली नगरपरिषद, खोपोली
### निविदा सुचना

जा.क्र. केएमसी/स्वच्छ सर्वेक्षण / ११६० दि. १८/०९/२०२४

खोपोली नगरपरिषद हद्दीत स्वच्छ सर्वेक्षण, ओ.डी.एफ. +/ओ.डी.एफ. ++, स्टार रेटिंग, माझी वसुंधरा व इतर अनुषंगिक बाबींअंतर्गत जनजागृतीविषयक विविध उपक्रम / कार्यक्रम राबविण्याकरिता अनुभवी पुरवठादार, ठेकेदार यांचे कडून e-tender पद्धतीने निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा प्रसिद्धीची वेळ | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | निविदेची माहिती मिळण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | खोपोली नगरपरिषद हद्दीत स्वच्छ सर्वेक्षण, ओ.डी.एफ. +/ओ.डी.एफ. ++, स्टार रेटिंग, माझी वसुंधरा व इतर अनुषंगिक बाबींअंतर्गत जनजागृतीविषयक विविध उपक्रम / कार्यक्रम राबविनेसाठी एजन्सी नेमुणूक करणेबाबत. | प्रथम | १००० | ५०००० | खोपोली नगरपरिषद |

कामाच्या अटी व शर्ती

१. सदर संपूर्ण निविदा प्रकिया ई-निविदाव्दारे ऑन लाईन पद्धतीने संगणक प्रणाली द्वारे होईल. सदर निविदा, नोटीसा, प्रसिद्धी, सूचना, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्रक इत्यादिची माहिती ऑनलाईन http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

२. वरील कामांची निविदा http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन खालील दिलेल्या कालावधीत असेल.

**सही/-**
**नोडल अधिकारी स्वच्छ सर्वेक्षण**
**खोपोली नगरपरिषद**

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ३५/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड व विळे- भागड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.... महाड व विळे- भागड येथील विविध ठिकाणी स्थापित केलेल्या व्हिटी पंपाची व व्हिएनसी पंपांची वार्षिकतत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १३,७१,२९९.०० |
| २ | रोहा औद्योगिक क्षेत्रासाठी पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... रोहा येथील जलशुद्धीकरण केंद्रातील वीज भार वाढविण्यासाठी उच्चदाब मीटरिंग क्यूबिकल बदलणे. | ₹ ४,२३,६३५.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १९/०९/२०२४ ते दिनांक २६/०९/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २३/०९/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २४/०९/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

### ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
### ता. पनवेल, जि. रायगड
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**ऑगस्ट २०२४**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | अक्षय शशिकांत करगुटकर / श्रध्दा शशिकांत करगुटकर | श्वेता परेश डोयले / परेश देवेंद्र डोयले | पवल-२- ५६४२-२०२४ | १५/०३/२०२४ | सदनिका क्र. बी १०४. पहिला मजला, बी विंग, कार्तिक्य पार्क को.हौ. सो., बि.नं.२, मौजे शिलोत्तर रायचूर, सुकापूर. |
| २ | कान्हाईकुमार चौधरी/ सरस्वती के चौधरी | कौस्तुभ बंडोपंत सागवेकर | पवल-१- २८७३-२०२४ | १२/४/२०२४ | सदनिका क्र. १२, पहिला मजला, बि.क्र.जी ८, यमुना को.हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ३ | समीर गणपत जाधव / स्वरदा समीर जाधव | प्रदीप देवेंद्र वानले | पवल-२- ५७५७-२०२४ | १९/३/२०२४ | सदनिका क्र. बी १०५, पहिला मजला, बी विग, स्वानंदभूमी को.हौ.सो.. बि.नं.१, मौजे पालीदेवद, सुकापूर, |
| ४ | नितीन रामचंद्र पाटील | सरिता विजय पाटील / निमेश विजय पाटील / मैथिली विजय पाटील | पवल-१- ४९२३-२०२४ | २६/६/२०२४ | सदनिका नं.११, बि.नं.१, पहिला मजला, त्रिदेव को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ५ | जय नारायण | संदेश महादेव कांबळे | पवल-१- ५९०२-२०२४ | १/८/२०२४ | सदनिका नं.०५, बि.नं.जी ८, तळ मजला, युगांतक कॉम्प्लेक्स, यमुना को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ६ | प्रभू विठ्ठल उगले / कमल प्रभू उगले | सूर्यकांत बाबाजी चव्हाण | पवल-१- ६०९६-२०२४ | ८/८/२०२४ | सदनिका नं.सी.२, बि.नं.ई २, तळ मजला, स्नेहकुंज को.हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| ७ | विनोद लक्ष्मण साटेलकर/अक्षता विनोद साटेलकर | मे.राम रत्न बिल्डर्स तर्फे भागीदार विनोद चांदे | पवल-३- १९६६५-२०२२ | २३/११/२०२२ | सदनिका नं. १०४, पहिला मजला, ए विग, श्री वसंत विहार को.हौ.सो. मोजे शिलोत्तर रायचूर. |
| ८ | विशाल जालिदर सोनावणे/ वैशाली विशाल सोनावणे | अजित गजानन नाईक | पवल-१- ५८९१-२०२४ | १/८/२०२४ | सदनिका नं.बी १०४, पहिला मजला, बी विंग, बि.नं. ०१, स्वानंदभूमी को.हौ.सो. मौजे पालीदेवद, |
| ९ | सुनिल बुढननाथ उपाध्याय / विन्ध्यवासिनी उपाध्याय | ब्रम्हदेव राजनाथ दुबे / प्रेमा ब्रम्हदेव दुबे | पवल-२- १९६८-२०२४ | ३१/१/२०२४ | सदनिका नं. ०२, तळ मजला, जय बालाजी कृपा को.हौ. सो, मौजे पालीदेवद |
| १० | रोहन नरेश पयेर / रोहित नरेश पयेर/सनी नरेश पयेर | उषा भगवान पाटील संमती देणार - नवनाथ बिल्डर्स तर्फे श्री. पंढरीनाथ चां. ठाकूर | पवल-२- १३०८-२०२४ | १९/१/२०२४ | सदनिका नं. २०१, दुसरा मजला, ए विंग, नवनाथ कृपा को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ११ | निवृत्ती जालंदर पाटील | जालंदर रामचंद्र पाटील | पवल-५- १९७९१-२०२२ | ९/१२/२०२२ | सदनिका क्र. एफ १०२, पहिला मजला, विठोबा कॉम्प्लेक्स, बि.नं. २, मौजे पालीदेवदः |
| १२ | नवज्योत जालंदर पाटील / जालंदर रामचंद्र पाटील | विक्रम लक्ष्मण ससाणे | पवल१- ५८१४-२०२४ | ३०/०७/२०२४ | सदनिका क्र. डी२०२, दुसरा मजला, डी विंग, बि.नं. ०२, विठोबा कॉम्प्लेक्स को हौ.सो. मोजे पालीदेवद |
| १३ | सौरभ सुभाष जगताप / भारती सुभाष जगताप | साधन कुमार भौमिक / रमा एस. भौमिक | पवल १- ५१३९-२०२४ | ३/७/२०२४ | सदनिका क्र. १०३, पहिला मजला, देवी दर्शन रेसिडेन्सी को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १४ | सचिन अनंत निवगुने / निमिका सचिन निवगुने | बिनु.पी. वर्गीस | पवल २- ५७५९-२०२४ | १९/३/२०२४ | सदनिका क्र. ३०१, तिसरा मजला, श्रेयस होम्स को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १५ | उन्नती महेंद्र गावंड / महेंद्र धनाजी गावंड / अंकित महेंद्र गावंड | / शोभा रुपेश सारंग / रुपेश अर्जुन सारंग | पवल २- २०५३६-२०२३ | २३/११/२०२३ | सदनिका क्र.बी.१०४, पहिला मजला, गंगोत्री सागर को. हो. सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| १६ | सचिन प्रभाकर सोनावणे | मे. अरबुदा होम्स तर्फे मुकेश चौधरी | पवल २- ९१९-२०२४ | १६/०१/२०२४ | सदनिका क्र. २०६, दुसरा मजला, मोहित इन्क्लेव्ह को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १७ | उषा कृष्णा साळुंखे | मे. अरबुदा होम्स तर्फे मुकेश चौधरी | पवल २- ५८९२-२०२४ | २०/०३/२०२४ | सदनिका क्र. ४०२, चौथा मजला, मोहित इन्क्लेव्ह को.हौ. सो. मौजे पालीदेवद |
| १८ | कल्पेश जालंदर पाटील / प्रगती कल्पेश पाटील | पराग रमेश मेहेतर | पवल ५- ६२६-२०२२ | १३/०१/२०२२ | सदनिका क्र.सी. २०४, दुसरा मजला, विठोबा को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| १९ | प्रविण अंकुश पवार / किरण प्रविण पवार | योगेश नारायण रविढोणे / प्राची योगेश रविढोणे | पवल ३- १४२५७-२०२४ | १२/७/२०२४ | सदनिका क्र. ३०३, तिसरा मजला, एच विंग, बि.नं. ४, साई इन्क्लेव्ह को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| २० | दाजी नामदेव पडळकर १ ले मालक | संजयकुमार रामकरण अग्रवाल | पवल१- ५५५-२०२४ | २३/१/२०२४ | शॉप नं.१, तळ मजला, निंबेश्वर कुंज को.हौ. सो. मौजे पालीदेवद |
|  | अंजली विनोद सकपाल / विनोद सखाराम सकपाल २ रे मालक | दाजी नामदेव पडळकर | पवल१- ४५६३-२०२४ | १३/०६/२०२४ |  |
| २१ | पुष्पाबाई देवी सिंह / देवी सिह | भीमराव निवृत्ती वाघमारे तर्फे कायदेशीर वारस १. सुधीर भीमराव वाघमारे २. निर्मला भीमराव वाघमारे ३. सागर भीमराव वाघमारे ४. पल्लवी भीमराव वाघमारे | पवल १- ३२६१-२०२१ | २५/०३/२०२१ | सदनिका क्र.३, तळ मजला, बि.नं.३. साई समर्थ को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| २२ | देवचंद लक्ष्मण ढेपे / पल्लवी देवचंद ढेपे | जानवी संजय धनावडे / संजय रुपाजी धनावडे | पवल १- ६२७९-२०२४ | १६/०८/२०२४ | सदनिका क्र.ए १०३, पहिला मजला, ए विंग, समृध्दभूमी को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| २३ | सुदेश रुपचंद बेन्हवाल / पूनम सुदेश भेंवल | एस. श्रीनिवास कामाक्षी | पवल १- ३९४३-२०२४ | २७/०५/२०२४ | सदनिका क्र.६, पहिला मजला, एल १, आकाशदीप को.हौ.सो. मौजे पालीदेवद |
| २४ | भागीरथ बाबूराव कांबळे/ संगीता भागीरथ कांबळे | माया कृष्णकुमार / कृष्णकुमार वेलयुथन नायर | पवल २- ४४६२-२०२४ | १/३/२०२४ | सदनिका क्र.सी ०१, तळ मजला, बी विंग, बि.नं. १, स्वर्णभूमी को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| २५ | सुनिल सुभाष कांबळे / सोनाली सुनिल कांबळे | मुकेश कुमार महेंद्र गुप्ता | पवल ३- ८९२६-२०२४ | ७/५/२०२४ | सदनिका क्र. सी १०१, पहिला मजला, सी विंग, ओम श्री कार्तिक्य गार्डन फेज ३, को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| २६ | संजय भीमराव आसवले / रेश्मा संजय आसवले | सुनिल हरिलाल चौरसिया | पवल ३- १४६८३-२०२४ | १८/७/२०२४ | सदनिका क्र. २०२, दुसरा मजला, बी विग, ओम श्री कार्तिक्य गार्डन, फेज ३. को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| २७ | गौतम महादेव उबाळे / संगीता गौतम उबाळे | अनुपमा आनंद परब / आनंद भगवान परब | पवल २- ६२०५-२०२४ | २४/३/२०२४ | - सदनिका क्र. ए १०४, पहिला मजला, बि.नं. १, स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स को.हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| २८ | प्रियंका दिलीप भोसले | सदाशिव काशिनाथ दिक्षीत | पवल- ६२६-२०२४ | ११/१/२०२४ | सदनिका क्र.००१, तळ मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| २९ | मंजू कुमार विश्वकर्मा | ब्लू स्टोन रियल्टी तर्फे अब्बास रियासत शेख | पवल- २८७७-२०२४ | १२/२/२०२४ | सदनिका क्र.००२, तळ मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| ३० | सतिश विठ्ठल बरदाडे / उमा सतिश बरदाडे | ब्लू स्टोन रियल्टी तर्फे अब्बास रियासत शेख | पवल ३१५१-२०२४ | १४/२/२०२४ | सदनिका क्र.१०३, पहिला मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| ३१ | दिपक दत्तात्रेय भगत | ब्लू स्टोन रियल्टी तर्फे अब्बास रियासत शेख | पवल ४२३९-२०२४ | २९/२/२०२४ | सदनिका क्र.१०४, पहिला मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| ३२ | संदीप धर्माजी सोनावणे / माधुरी संदीप सोनावणे | ब्लू स्टोन रियल्टी तर्फे अब्बास रियासत शेख | पवल ४२२८-२०२४ | २९/२/२०२४ | सदनिका क्र. १०६, पहिला मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| ३३ | किशोरी किशोर कांबळे / किशोर विष्णू कांबळे | ब्लू स्टोन रियल्टी तर्फे अब्बास रियासत शेख | पवल ६९९७-२०२४ | ३/४/२०२४ | सदनिका क्र. १०७, पहिला मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| ३४ | मे.बेअव्हेर इन्फ्रा कन्सलटंटस् प्राय.लि.तर्फे डिरेक्टर विना रंजीत | ब्लू स्टोन रियल्टी तर्फे अब्बास रियासत शेख | पवल ३१०३-२०२४ | १४/२/२०२४ | सदनिका क्र. २०४, दुसरा मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| ३५ | विना रंजीत | ब्लू स्टोन रियल्टी तर्फ अब्बास रियासत शेख | पवल ३१०४-२०२४ | १४/२/२०२४ | सदनिका क्र. २०७, दुसरा मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| ३६ | सुधाकर भाऊ बाजी / सुजित सुधाकर बाजी | ब्लू स्टोन रियल्टी तर्फे अब्बास रियासत शेख | पवल ७३४३-२०२४ | १०/४/२०२४ | सदनिका क्र.३०४, तिसरा मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| ३७ | यज्ञेश रामचंद्र पाटील / पार्वती रामचंद्र पाटील / रामचंद्र माया पाटील | ब्लू स्टोन रियल्टी तर्फे अब्बास रियासत शेख | पवल ५३६०-२०२४ | १४/३/२०२४ | सदनिका क्र. ३०६, तिसरा मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| ३८ | प्रिया सचिन धसाडे / सचिन हरिश्चंद्र धसाडे | ब्लू स्टोन रियल्टी तर्फे अब्बास रियासत शेख | पवल ४२२६-२०२४ | २९/२/२०२४ | सदनिका क्र.४०६, चौथा मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| ३९ | मधुसूदन एम. साकरे -/ शालिनी मधुसूदन साकरे | ब्लू स्टोन रियल्टी तर्फे अब्बास रियासत शेख | पवल ११२५२-२०२४ | ३०/५/२०२४ | सदनिका क्र.४०७, चौथा मजला, ए विंग, ओम साई हेरिटेज, मौजे पालीदेवद |
| ४० | मालती योगेंद्रनाथ त्रिपाठी / अमित योगेंद्रनाथ त्रिपाठी / संदीप योगेंद्रनाथ त्रिपाठी | योगेंद्रनाथ शिवशंकर त्रिपाठी | दि.चौ.अर्ज २७/२०२४ | १६/४/२०२४ | सदनिका क्र.डी ०६, वृंदावन कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(श्री. एन. जी. केणी)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# लूटमार करणारी टोळी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

दिवसा नोकरी करून रात्रीच्यावेळी एक्सप्रेस महामार्गावर लूटमार करणाऱ्या एका सराईत टोळीतील पाच जणांच्या टोळीला पनवेल तालुका पोलिसांनी अत्यंत नाट्यमय रित्या वेषांतर करून ताब्यात घेतले आहे.



या आरोपींच्या अटकेमुळे पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीसह खालापूर आणि परिसरातील अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपुरी यांनी व्यक्त केली आहे. पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात पुणे मुंबई द्रुतगती महामार्गावरील पुणे लेनवर ट्रक चालक गेंदलाल रामगरीब पटेल हा लघुशंका करण्यासाठी पळस्पे हायवे पोलीस चौकीच्या २०० मिटर पुढे थांबला होता. या वेळी पाच ते सात अज्ञात व्यक्तींनी त्यांना जिवे ठार मारण्याची धमकी देवून मारहाण केली. तसेच २ मोबाईल हॅन्डसेट आणि तेवीस हजार रुपये रोख रक्कम चोरी करून नेली होती. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र पथक गठीत करण्यात आले. या पथकाने गुन्हयाच्या तांत्रिक आणि गोपनिय माहितीद्वारे तसेच गुन्हयातील फिर्यादी ट्रक चालकाकडे तपास करून आणि वेषांतर करून खालापूर परिसर पिंजून काढला.

या वेळी त्यांनी आरोपींना निष्पन्न करून त्यापैकी रोहन उर्फ गुड्डु गोपीनाथ नाईक, रोहिदास सुरेश पवार, आतेश रोहिदास वाघमारे, मनिष काळुराम वाघमारे, शंकर चंदर वाघमारे यांना सापळा लावून, शिताफीने अटक केले. दरम्यान, या गुन्हयातील इतर ३ आरोपींचा शोध सुरू आहे. अटक आरोपींना २० सप्टेंबर रोजीपर्यंत पोलीस कोठडी रिमांड देण्यात आलेली आहे. या आरोपींकडून ४८ हजार किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

यात एक्केचाळीस हजार रुपयांचे पाच मोबाईल फोन आणि सात हजार रोख रक्कमेचा समावेश आहे. या गुन्ह्यातील अटक आरोपी रोहन उर्फ गुड्डु गोपीनाथ नाईक हा सराईत गुन्हेगार असून त्याने यापुर्वी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २, खालापुरमध्ये दोन जबरी चोरी आणि दरोड्याचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे.

# नेत्रा पाटील यांच्या मागणीमुळे मेट्रोच्या भाड्यात ३३ टक्के कपात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी नवी मुंबई मेट्रोच्या तिकीट दरात कपात करण्याबाबत सिडकोला केलेल्या मागणीला यश आले आहे. सिडकोतर्फे मेट्रोच्या भाड्यात ३३ टक्के कपात करण्यात आली आहे. त्यामुळे तिकिटाचे किमान भाडे १० व कमाल ३० रुपये झाले आहे.

माजी नगरसेविका पाटील यांनी मेट्रोचे सध्य स्थितीला असलेले तिकीट दर सर्वसामान्य प्रवाश्यांना न परवडणारे असून त्या तिकीट दरात कपात करणे गरजेचे आहे, अशी विनंती पत्राद्वारे केली होती. यासोबतच नवी मुंबई मेट्रोची अनेक स्टेशन हे ह्या महाविद्यालयांच्या जवळपास आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनादेखील ते सोयीचे होते विद्यार्थी वर्गाकडून देखील सवलतीच्या दरात मासिक पास योजना सुरू करण्यात यावी, अशी मागणी केली होती. सर्व प्रवासी वर्गाचा व विद्यार्थ्यांच्या मागणीचा विचार करता आपण नवी मुंबई मेट्रोच्या तिकीट दरात कपात करावी, अशी मागणी केली होती.

या मागणी दखल सिडको प्रशासनाने घेऊन त्यांनी नेत्रा पाटील यांच्या निवेदनाची दखल घेत सिडकोतर्फे मेट्रोच्या भाड्यात ३३ टक्के कपात करण्यात आली असल्याचे पत्र दिले आहे.



**पनवेल : भाजपचे उलवे नोड १चे अध्यक्ष निलेश खारकर यांच्याकडे वास्तुशांतीनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट दिली. त्यांचे खारकर कुटुंबीयांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत तसेच अमोघ ठाकूर उपस्थित होते.**



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून स्वच्छता अभियान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, अध्ययन व अध्यापन विस्तार विभाग व पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.१८) खारघर येथील येथील सेक्टर ३५ येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली म्हणून दरवर्षीप्रमाणे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या दरम्यान स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे या उपक्रमांकर्गत स्वभाव स्वच्छता–संस्कार स्वच्छता हा उपक्रम राबवण्यात येत आहे याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील तसेच अध्ययन व अध्यापन विस्तार विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीनी खारघर येथील सेक्टर ३५ येथे जाऊन स्वच्छता मोहीम राबविली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या स्वच्छता अभियानामध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर व प्रा. महेश धायगुडे यांनी केले तसेच पनवेल महापालिकेचे सर्व पदाधिकारी, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. प्रथमेश उदेकर प्रा. व प्रा. राहुल कांबळे तसेच दोन्ही समितीतील सर्व सदस्यांनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# गणेशोत्स्वानिमित्त पैठणीचा कार्यक्रम

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

आदर्श युवा मित्र मंडळाचा आदर्श उपक्रम कळंबोलीमधील सेक्टर ४चा राजा म्हणून ओळखला जाणारा गणपती व या मंडळाचे वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्यानुसार यंदा महिलांसाठी पैठणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यामध्ये महिलांना संगीत खुर्ची बकेट बॉल व त्यानंतर सामाजिक व राजकीय विषयावरील प्रश्नमंजुषा आयोजित केली होती. त्यामधून तीन स्पर्धक महिला निवडण्यात आल्या. या स्पर्धेचे पैठणीचे प्रायोजक होत्या भाजपच्या कळंबोली महिला सचिव बायजा बबनराव बारगजे व या स्पर्धेच्या प्रथम पारितोषिक पैठणी विजेत्या ठरल्या प्रियांका चव्हाण त्याचप्रमाणे द्वितीय पारितोषिक विजेत्या ठरल्या वर्षा बांगर व तृतीय पारितोषिक विजेत्या ठरल्या रुपाली मोरे.

सर्व महिलांसाठी हळदी कुंकूचाही कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता . हे सर्व कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष नागेश केसकर उपाध्यक्ष बबन बारगजे खजिनदार प्रशांत देवकर मंडळाचे सदस्य दत्ता चौधरी, गणेश पिसाळ, महेश बारगजे, तेजस पोटे, शुभम टेमगिरे, अभिजित खडसे, रोहित माने, ऋषिकेश पोटे, कृष्णा गर्जे, पारस बिसुरे इत्यादी कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.





**खारघर : श्री विश्वकर्मा समाज असोसिएशन खारघर यांच्या वतीने आयोजित सार्वजनिक विश्वकर्मा महापूजा महोत्सवात आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून विश्वकर्मा जयंतीच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. खारघर सेक्टर १२ शिवमंदिर येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**



**पनवेल : मदन कोळी यांच्या घरातील गणरायाचे विसर्जनापूर्वी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले. या वेळी अंकुश पाटील उपस्थित होते. कोळी कुटुंबीयांकडून दोघांचे स्वागत करण्यात आले.**



**पनवेल : भारतीय जनता माथाडी जनरल कामगार संघाच्या जुनी टोळी नंबर १ गट क्रमांक जी ४२ ते ५१ मधील माथाडी कामगारांच्या वतीने रामविजय ग्रंथ समाप्ती आणि श्री गणेशोत्सवानिमित्त सत्यनारायणाच्या महापुजेचे आयोजन केले होते. या पुजेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी शिवसेना पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगरसेवक अमर पाटील, बबन मुकादम, राजू शर्मा, माजी नगरसेविका मोनीका महानवर, भाजप नेते अशोक मोटे, माजी जि. प. सदस्य अमित जाधव आदी उपस्थित होते.**

# प्रबोधनकार ठाकरे यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या मुख्यालयात मंगळवारी (दि.१७) प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजीत कारलेकर, उपायुक्त रवीकिरण घोडके, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, लेखा अधिकारी संग्राम व्होरकाटे , उपअभियंता विलास चव्हाण, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





**पनवेल : ईद–ए–मिलादुन्नबीनिमित्त पळस्पे फाटा येथे निघालेल्या रॅलीला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कोन गाव येथे भेट दिली. भाजप कार्यकर्ते नासिर शेख यांनी या रॅलीचे आयोजन केले होते. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये महिला रेल्वे प्रवाशी सुरक्षासंदर्भात जनजागृती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल लोहमार्ग पोलीस ठाणे अंतर्गत लोकल लाईन जनरल हॉल येथे खाकीतील सखी व Coto app (कोटो ॲप)बाबत सोमवारी (दि.१६) जनजागृती करण्यात आली आहे.

या वेळी मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाकडून खाकीतील सखी भरोसा करके तो देखो ह्या मोहीम अंतर्गत रेल्वे प्रवासादरम्यान महीला सुरक्षा तसेच जागरूकतेचे बॅनर घेवुन पत्रके तसेच Coto appची पत्रके महिला प्रवाशाना वाटप व प्रसारित करण्यात आली आहेत.

महिला प्रवाशांना प्रवासात सुरक्षेबाबत व प्रवासादरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास रेल्वे पोलीस हेल्पलाईन नंबर १५१२ व त्या पत्रकामध्ये दिलेल्या खाकीतील सखी यांचे मोबाईल क्रमांकावर संपर्क करणेबाबत आवाहन करण्यात आले. तसेच Coto app डाउनलोड करणेबाबत तसेच नवीन हेल्प लाईन क्रमांक ८९७६००४१११, ८८५०२००६००, ०२२४५१६१६३५ बाबत माहिती देऊन जनजगृती करण्यात आली.

या मोहिमेस महिला प्रवाशी तसेच रेल्वे प्रवाशांनी चांगला प्रतिसाद दिला. जनजागृतीसाठी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रवीण पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून एपीआय कणसे, पीएसआय जगताप व ११ अंमलदार असे उपस्थित होते.

# गणेशोत्सवात रंगले बकुळ बाग कवीसंमेलन



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सीवूड्स सेक्टर ४२ मधील सिवुडचा राजा गणेशोत्सवात १४ सप्टेंबर रोजी नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ संस्थेच्या वतीने बकुळ बाग कवीसंमेलन संमेलन उत्साहात झाले. साहित्यिका शैलजा शेवडे यांच्या अध्यक्षतेखालील या कविसंमेलनात नवी मुंबई, पनवेल, अलिबाग, डोंबिवली परिसरातील एकुण २१ कवींना सहभाग घेतला.

कवयत्री दुर्गा देशमुख यांनी या कवीसंमेलनाचे सूत्रसंचालन केले. गणेशोत्सवात काव्य कला जपणे ही आनंदाची पर्वणी असल्याचे प्रतिपादन अध्यक्षा शैलजा शेवडे यांनी केले. सर्व कवींचे स्वागत नवरंगचे अध्यक्ष गज आनन म्हात्रे यांनी केले. तर सिवुडचा राजा गणेश मंडळाचे अध्यक्ष रवींद्र महाडिक यांनी सर्व कवींचा श्रीफळ आणि कापडी पिशवी देऊन सन्मान केला. माजी नगरसेवक अंकुश गावडे यांनी अभिनंदन केले. या वेळी सीवूड्स परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.



**उरण : येथे प्रभाकर नवले यांची निवडणूक नायब तहसीलदारपदी नियुक्ती झाल्याबद्दल उरण तहसीलदारांकडून स्वागत करण्यात आले.**



**पनवेल : येथील रोज बाजार भाजी मार्केटच्या गणरायाचे भक्ती भावाने विसर्जन करण्यात आले. या वेळी स्वयंसहाय्यता महिला मंडळाच्या अध्यक्ष व माजी नगरसेविका दर्शना भोईर व रोज बाजार भाजी मार्केट गणेशोत्सव पदाधिकारी उपस्थित होते.**

# पुढच्या वर्षी लवकर या...!

## रोहा तालुक्यात गणरायाला भावपूर्ण निरोप

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यात दहा दिवसांच्या गणपतीला भक्तांनी भावपूर्ण निरोप दिला. गणपती बाप्पा मोरया.. पुढच्या वर्षी लवकर या.. अशी साद देत लहानग्यांसह मोठ्यांनाही अश्रू अनावर झाले.

आरती पूजा, अर्चा करून गणेशभक्तांनी गणरायाला निरोप देण्यासाठी तयारी पूर्ण केली. पारंपरिक खालू वाद्य, ढोल-ताशा, डिजे व टाळ वाजवीत गणरायाला विसर्जन ठिकाणी घेऊन येताना दिसत होते. शहरातील बंदरपकटी, कुंडलिका नदी संवर्धन घाट, दमखाडी घाट, अष्टमी घाट या ठिकाणी दुपारी ३ वाजल्यापासूनच गणरायाची मिरवणूक काढून विसर्जनासाठी भक्त येण्यास सुरुवात झाली. बाजारपेठेत भव्य अशी



मिरवणूक रोहा शहरातील मोरे अळी, अंधार आळी, धनगर आळी, दमखाडी, धावीर रोड येथून मिरवणूक काढून गणपती विसर्जन करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत गणपतीचे विसर्जन चालू होते.

एक गाव एक गणपती असलेल्या रोहा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे गणपती, भुवनेश्वर येथील जय गणेश मित्र मंडळाचे गणपतीचे वाजत गाजत मिरवणूक काढून भावपूर्ण अंतःकरणाने गणरायाला निरोप देण्यात आले. विसर्जन घाट नगर परिषदेच्या वतीने येथे लाईटची व्यवस्था करण्यात आली होती. मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विसर्जन घाट येथे नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले होते. त्या ठिकाणी स्वच्छता ही करण्यात आली होती. नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी विसर्जन घाटावर गणरायाचे स्वागत करीत होते व निर्माल्यही जमा केले. काही सामाजिक संस्थेने ही निर्माल्य जमा करण्यासाठी व्यवस्था केली होती.

पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यातच्या हद्दीत येणाऱ्या विविध विसर्जन ठिकाणी ठिकाणी पोलीस तैनात करण्यात आले होते. वाहतुकीसह विसर्जन घाट येथे पोलीस तैनात करण्यात आले होते. पोलिसांचा चोख बंदोबस्त दिसून आला. रोहा शहरासह तालुक्यातील चणेरा, भालगाव, घोसाळे, धाटाव, खांब, कोलाड, सुतारवाडी, देवकान्हे, धामणसई, मेढा, यशवंतखार, सानेगाव, नागोठणे, एनघर, सुकेळी आदी विभागात उत्साही वातावरणात व शांततेत गणेश विसर्जन झाले.

## नागोठण्यात बाप्पांना भावपूर्ण निरोप

**नागोठणे : बातमीदार**

गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या, गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला असा जयघोष करीत नागोठण्यात लाडक्या गणपती बाप्पांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील दहा दिवसांचे २२० खासगी व आठ सार्वजनिक गणपती बाप्पांना मंगळवारी भावपूर्ण वातावरणात येथील अंबा नदी विसर्जन घाटावर निरोप देण्यात आला. हायवेनाका गणेशोत्सव मंडळाचा नागोठणे ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गणेश भक्तांकडून पारंपरिक पद्धतीने ढोल-ताशांच्या गजरात वाजत, गाजत, नाचत बाप्पांची मिरवणूक काढण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विसर्जनस्थळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



## माथेरानमध्ये गणेशोत्सवाची सांगता

**माथेरान : प्रतिनिधी**

चैतन्यमय वातावरणात सुरू झालेल्या गणेशोत्सवाची अनंतचतुर्दशीला मंगळवारी (दि.१७) गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या.. अशा गजरात लाडक्या बाप्पाला निरोप देत मंगल सोहळ्याची सांगता झाली.

दहा दिवस गणरायाला अभ्यंग, पंचामृत, धूप, दीप, मोदकांचा नैवेद्य असा भक्तांचा पाहुणचार घेऊन श्रीगणेशाने निरोप घेतला. विसर्जनस्थळी मंगळवारी संध्याकाळी गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या अशा जयघोषात बाप्पांचे येथील वाहत्या पाण्यात विसर्जन करण्यात आले.

माथेरानमध्ये अजूनही जुन्या परंपरेनुसार पारंपरिक



पद्धतीने मिरवणूक काढली जाते. टाळ-मृदुंगाच्या व गणेशगीतांच्या सुरात, गणपती बाप्पा डोक्यावर घेऊन एका रांगेत ही मिरवणूक बाजारपेठेतून विसर्जन स्थळाकडे निघाली.

या मिरवणुकीमध्ये आणि विसर्जनस्थळी कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये यासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्याचबरोबर विसर्जनस्थळी माथेरान पालिकेचे कर्मचारीदेखील उपस्थित होते.

गणेशभक्तांनीदेखील चांगले सहकार्य केल्यामुळे विसर्जन सोहळा आनंदात व अगदी शांततेत पार पडला.

## माणगावात दहा दिवसांच्या गणपतींचे विसर्जन

**माणगाव : प्रतिनिधी**

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, गणपती गेले गावाला चैन पडे ना आम्हाला..च्या गजरात माणगावसह तालुक्यातील दहा दिवसांच्या १४ सार्वजनिक व ७४१ घरगुती गणपतींना भावपूर्ण निरोप देत गणपतींचे विसर्जन करण्यात आले.

अनंतचतुर्थीच्या दिवशी दुपारपासूनच विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी व गणेशभक्तांनी आपले गणपती विसर्जनासाठी बाहेर काढले. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा साईनगराचा राजा, जय हनुमान मित्र मंडळ उतेखोलवाडीचा गणराय,





एकलव्य मित्रमंडळ नाणोरे आदिवासीवाडीचा गणराय, माणगाव बसस्थानकातील गणराय, ढालघरचा राजा हे एक आकर्षण होते.

विविध मंडळातील तसेच घरगुती गणरायांच्या पुरुष व महिला गणेशभक्त डिजेच्या आवाजात नाचत मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, सर्व नगरसेवक, नगरसेविका, मुख्याधिकारी संतोष माळी, कर्मचारी तसेच पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गणेश भक्तांचे स्वागत केले.

विसर्जन ठिकाणी माणगाव नागरपंचायतीतर्फे गणेशभक्तांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव अंतर्गत कृत्रिम विसर्जन तलावाचा उपयोग करून पर्यावरणाचे रक्षण करा, माझी वसुंधरा, स्वच्छ सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत निर्माल्य येथे टाकावे, असा संदेश असा संदेश देण्यात आला होता.

येथील काळ नदीच्या गणपती विसर्जन घाटाजवळ नगरपंचायतीचे कामगार गणरायाचे विसर्जन करण्यासाठी तैनात ठेवण्यात आले होते.

उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी व पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## श्री सदस्यांकडून वाहून आलेल्या १४८ मूर्तींचे पुन्हा विसर्जन



**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यात दहा दिवसांच्या गणरायांना मंगळवारी (दि.१७) भावपूर्ण निरोप देण्यात आला. विसर्जनानंतर समुद्रकिनारी वाहून आलेल्या सुमारे १८४ गणशमूर्तींचे डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे पुन्हा खोल समुद्रात जाऊन विसर्जन केले.

विसर्जनाच्या दुसऱ्याच दिवशी सकाळी १४८ प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती वाहून आल्या. डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे त्या गणेशमूर्तींचे ४४ श्री सदस्यांनी पुन्हा खोल समुद्रात नेऊन विसर्जित केल्या व संपूर्ण समुद्रकिनारा स्वच्छ केला. पहाटे ६ वाजताच श्री सदस्य किनारा स्वच्छ करण्याचे काम सुरू केले होते. किनारी वाहून आलेले निर्माल्य एकत्र करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली.

गिरगाव चौपाटी येथेही डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे गणेशमूर्ती सोबत निर्माल्याचे संकलन करण्यात आले.

## पाली-खोपोली महामार्गावर एसटी-कारचा अपघात

### कारमधील दोघे गंभीर जखमी; बसमधील विद्यार्थी बचावले

**पाली : प्रतिनिधी**

पाली-खोपोली राज्य महामार्गावर बुधवारी (दि.१८) एसटी व कारचा अपघात घडला. या अपघातात कारमधील दोघे गंभीर जखमी झाले असून बसमधील विद्यार्थी सुदैवाने बचावले आहेत.

पाली-खोपोली राज्य महामार्गावरून कर्जतहून एनसीसीचे विद्यार्थी घेऊन पालीकडून लोणेरेकडे जाणारी बस (एमएच २० बीएल ३३६७) व पालीकडून खोपोली बाजूकडे आयुष गायकवाड चालवत असलेली सेलेरिओ कार (एमएच १४ एचडि ५३२५) यांचा समोरासमोर अपघात झाला. एसटी बसचा पाटा तुटल्यामुळे स्टेअरिंग लॉक झाले आणि एसटी बस बाजूच्या शेतामध्ये कलंडली, तर कारच्या सीटबेल्ट व एअर बॅग उघडल्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र कारचालकाच्या हाताला दुखापत झाली व शेजारच्या प्रवाशाच्या डोक्याला लागले आहे.

विद्यार्थी सुखरूप असल्यामुळे त्यांनी दुसरी गाडी करून ते लोणेरेकडे रवाना झाले. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला आहे. भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा यांनी विद्यार्थ्यांची विचारपूस केली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक व पोलिसांनी घटनास्थळी पोहचून मदतकार्य केले. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



## खालापुरात तहसीलदारांच्या हस्ते वृक्षारोपण

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

तालुक्याचा तहसीलदार पदाचा नुकताच कार्यभार स्वीकारलेले तहसीलदार अभय चव्हाण यांच्या हस्ते सहाय्यक फौजदार कै. महेश मधुकर कळमकर उद्यानात वृक्षारोपण करण्यात आले.

दिलासा फाउंडेशन खालापूर आणि रायगड मावळ पत्रकार संघाचा ३६५ दिवस ३६५ वृक्ष असा उपक्रम आहे. या उपक्रमांतर्गत खालापूर परिसरात विविध बहुगुणी औषधी वृक्षांची लागवड व जोपासना करण्यात येत आहे. तालुक्याच्या ठिकाणी नव्याने आलेले प्रशासकीय अधिकाऱ्यांचे स्वागत वृक्ष देऊन तसेच वृक्ष लागवड करून देण्याची प्रथा दिलासा



फाउंडेशनने सुरू केली आहे.

तहसीलदार अभय चव्हाण नव्याने खालापूरला रुजू झाले असून औषधी बहुगुणी असे चिंच वृक्ष भेट देऊन लागवड करण्यात आली. या वेळी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, विकास पवार, दिलासा फाउंडेशन आणि रायगड मावळ पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज कळमकर, पत्रकार दीपक जगताप, सामाजिक कार्यकर्ते सुरेश गावडे उपस्थित होते.

## कर्जतमधील पदवीधर शेतकऱ्याचा सेंद्रिय शेतीचा प्रयोग यशस्वी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील बार्डी येथील तरुण हेमंत कोंडीलकर यांनी आपल्या पदवीपर्यंत शिक्षणाचा उपयोग प्रगत शेती करण्यासाठी केला आहे. सेंद्रिय शेती करण्यासाठी सेंद्रिय खते निर्माण करणारे हेमंत यांनी आपल्या शेतीमध्ये लागवड केली. भेंडीच्या एका भाजीची लांबी तब्बल १९ सेमीपेक्षा जास्त आहे.

पदवीधर तरुण हेमंत नामदेव कोंडिलकर यांनी आपल्याकडे सेंद्रिय खते विकसित केली आहेत. विविध भाज्यांचे पीक आपल्या शेतात घेऊन सध्याचे रासायनिक खतांच्या बाजारात सेंद्रिय खतांपासून निर्माण झालेली भाजी पिकविण्यावर त्यांनी आपला कल कायम ठेवला आहे.



हेमंत कोंडीलकर यांनी आपल्या गावातील शेतकरी परशुराम चौधरी यांच्या शेतात संकरित जातीच्या बियाण्याची लागवड केली आहे. जुलै महिन्यापासून भेंडीची आवक सुरू झाली आणि जास्तीच्या पावसाने भाजीपाला पिकाचे नुकसान झाले. त्यामुळे खचून न जाता हेमंत यांनी त्यावर मात करीत ऑगस्ट महिन्यात अर्धवट अवस्थेत शिल्लक राहिलेल्या रोपांच्या बुडाला तळाशी आजूबाजूला असणाऱ्या हिरव्या गवताचे आच्छादन दिले.

त्यानंतर दर १५ दिवसांनी स्वतः बनवलेले डिकंपोझर कल्चर, देशी गाईच्या पंचगव्यपासून पंचगव्य पाण्यात मिसळून दिले. त्याचा फायदा असा झाला की, हायब्रीड प्रकारच्या बियाणे पुन्हा फुलले आणि त्यापासून तब्बल दीड फूट लांबीचे भेंडी पाहायला मिळत आहे.

आता सप्टेंबर महिन्यात त्या पिकांनी नव्याने उभारी घेऊन केवळ सेंद्रिय खते यांचा वापर केल्याने पुन्हा एकदा शेती भरभराटीला आली आहे. या सेंद्रिय शेतीसाठी लागणारे घटक मध्ये प्रामुख्याने देशी गाईचे शेण, गोमुत्र, ताक, दूध, तूप, मध यांचा वापर करून सेंद्रिय खत निर्माण केले आहे. हे सेंद्रिय खत तालुक्यातील शेतकरी बांधवांकडून खरेदीदेखील केले जात आहे. त्या सेंद्रिय खतामुळे शेतकऱ्यांना देशी गाईचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रयत्न केला जात आहे.

सेंद्रिय शेतीसाठी हेमंत कोंडीलकर यांनी कृषी विभागाच्या वतीने प्रशिक्षण शिबीरसुद्धा घेऊन तालुक्यातील शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करण्याचा छोटासा प्रयत्न करीत आहेत.

## जुन्या सहकाऱ्यांचा प्रवेश म्हणजे विजयाची नांदीच -आमदार महेंद्र थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

आज माझे जुने सहकारी पुन्हा माझ्या माझ्यावर विश्वास ठेवून शिवसेना पक्षात पक्षप्रवेश करीत आहेत. ही माझ्यासाठी खूप आनंदाची व अभिमानाची बाब आहे. आपल्या पक्षप्रवेश म्हणजे विधानसभेच्या विजयाची नांदीच आहे, असा विश्वास आमदार महेंद्र थोरवे यांनी व्यक्त केला.

कर्जतमधील शिवसेना बाळासाहेब भवनमध्ये पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी जिल्हा प्रमुख संतोष भोईर, उपजिल्हाप्रमुख



भाई गायकर, तालुकाप्रमुख संभाजी जगताप, कर्जत खालापूर संघटक शिवराम बदे, रायगड जिल्हा संघटक अरुण देशमुख, सल्लागार सुनील रसाळ, माजी नगरसेवक संकेत भासे, नदीम खान तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव, ठाकरे गटाचे शहर संपर्कप्रमुख संजय मोहीते, शहर समन्वयक सुदेश देवघरे, उपशहरप्रमुख प्रसाद डेरवणकर, माजी नगरसेविका प्राची डेरवणकर, मनोज जाधव, राकेश शेट्टी, दिनेश वाघमारे हे आपल्या समर्थकांसह शिवसेनेत दाखल झाले. त्यांचे आमदार थोरवे यांनी स्वागत केले. संजय मोहिते यांनी, शहरात विकास होत आहे, मात्र गुंडगे परिसरात हवा तसा विकास होत नाही. आता आम्ही तुमच्याबरोबर आलो आहोत. त्यामुळे त्या भागाकडे लक्ष द्यावे, अशी मागणी केली. सूत्रसंचालन अभिषेक सुर्वे यांनी केले.

